म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
अ. नं.


समारंभाचे वेळीं मुलांमुलींनी
म्हणण्याकरितां

# गाणीं व संवाद.

ए. पी. बापट अॅन्ड ब्रदर्स,
बुकसेलर्स बुधवार पेठ, पुणें शहर.

मुद्रक,
...राव कोकाटे, 'हनुमान' प्रेस,
...दाशिव पेठ, पुणें शहर.

REFBK-0003698

सन १९२८. कि. ५ आणे.

नोंद ... १८

शाळांतील समारंभाचे वेळीं म्हणण्याकरितां मुलांमुलींकरितां.

# गाणीं व संवाद

लेखक व संग्राहक

## भिकाजी विठ्ठल महाजन

शिक्षक न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

प्रकाशक,

**ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स**

बुकसेलर्स, बुधवार पेठ पुणें शहर.

REFBK-0003698

REFBK-0003698

२०३

३५९८

किंमत ५ आणे.

सन १९२८

# प्रस्तावना.

शाळेचे समारंभ हे मुलांचे आनंदोत्सवच होत. या आनंदोत्सवांत भाग घेण्यासाठीं सारीं मुलें अत्यंत उत्सुक झालेलीं पाहून कोणत्या शिक्षकाला समाधान वाटणार नाहीं? असल्या समारंभांनीं शाळेची इभ्रतही वाढत जाते. याकरितां उत्साही शिक्षकांनीं अशा प्रकारचे समारंभ साजरे करण्याची संधि केव्हांही वायां घालवूं नये अशी त्यांना आग्रहाची विनंति आहे.

समारंभ करावयाचा ठरविलें कीं, मुलांसाठीं गाणीं व भाषणें पैदा करण्यास बरेच परिश्रम करावे लागतात, व हें काम चार दोन दिवसांत होण्यासारखें नसतें. गेल्या एक तपभर नवीन मराठी शाळेच्या मुख्याध्यापकाचें काम करीत असतांना ह्या बाबतींत परिश्रम करून मुलांसाठीं जीं गाणीं व भाषणें निवडलीं, त्यांतल्या विशेष परिणामकारक अशा गाण्यांचा व भाषणांचा प्रस्तुत पुस्तकांत संग्रह केला आहे. शाळेच्या बक्षिससमारंभासारख्या वार्षिक समारंभांत शिक्षकांस व मुलांस त्यांचा बराच उपयोग होईल, अशी खात्री वाटते.

असलीं पुस्तकें हीं कांहीं अभ्यासपुस्तकें नव्हत. तेव्हां त्यांचा खप होणें व छपाईचा सुद्धां खर्च भरून निघणें दुरापास्त वाटतें. तथापि माझे मित्र रा. **अनंतराव बापट** यांनीं हें छपाईचें काम आपल्या आंगावर घेतल्या कारणानें हें गाणीं व भाषणें यांच्या संग्रहाचें पुस्तक प्रसिद्ध होत आहे, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

शेवटीं ज्या ज्या लेखकांच्या पुस्तकांतून प्रस्तुत उतारे घेतले, त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

**पुणें**, ता. १५-८-१९२८ | **मि. वि. महाजन**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| १ मुलांची ईशप्रार्थना | १ |
| २ स्वागतपर पद | १ |
| ३ राजापूरकर भटजींची सफर | १ |
| ४ कृष्णशास्त्री महाशब्दे वैद्यराज | ३ |
| ५ फुलांचा संवाद | ५ |
| ६ ज्योतिषाचा धंदा | ७ |
| ७ मिळकतीपेक्षां कमी खर्च करा | ९ |
| ८ स्वागतपर पद | १२ |
| ९ पराचा कावळा | १२ |
| १० उशीर करणारा शंकर | १६ |
| ११ अश्वहरण | १७ |
| १२ अपराधाची कबुली | १९ |
| १३ ईशप्रार्थना | २१ |
| १४ गैरहजर राहणारा मुलगा | २२ |
| १५ याचकोपद्रव निवारक मंडळ | २३ |
| १६ समारोपपर पद | २९ |
| १७ गलिच्छ आणि गबाळ मुलगा | ३० |
| १८ खरा भाऊ कोण | ३१ |
| १९ परीक्षेचा निकाल | ३३ |
| २० मोडी जाणणारा पारशी ऑफिसर | ३५ |
| २१ उद्यमस्फूर्तिपर पद | ३७ |
| २२ गवयाचा धंदा | ३७ |
| २३ आजारपणाची हौस | ४० |

| विषय | पृष्ठें. |
|---|---|
| २४ दुर्योधन आणि शल्य यांचा संवाद ... ... | ४१ |
| २५ मनुष्यस्वभावाचा एक मासला ... ... | ४४ |
| २६ देवांची सभा ... ... ... | ४७ |
| २७ विचित्र हौस ... ... ... | ५३ |
| २८ परिक्षेचें गाणें ... ... ... | ५४ |
| २९ शिखासंरक्षक मंडळ ... ... ... | ५४ |
| ३० स्वागतपर गाणें ... ... ... | ५९ |


## आभारप्रदर्शन.


हे संवाद व गाणीं मूळ **नवीन मराठी शाळेच्या** वर्षास–समारंभासाठीं वेळोवेळीं तयार केलीं होतीं तीं एकत्र करून पुस्तकरूपानें छापण्यास परवानगी मिळावी म्हणून आम्ही केलेल्या विनंतीस शाळेच्या चालकांनीं मान्यता दिली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

पुणें, ता. १५।९।२८. } ... भिकाजी विठ्ठल महाजन. ... अनंत पांडुरंग वापट.

शाळांतील मुलांमुलींकरितां

# संवाद व पदें.

## मुलांची ईशप्रार्थना.

भक्तिभावें प्रेमभावें ईशचरणां वंदुं या ।
" करिं सुविद्य प्रभु अम्हांला " वर असा हा मागुं या ॥धृ०॥
पाव बाळां दीनबंधो ज्ञान दे जें श्रेष्ठ यां ।
ज्ञानरविचा उदय करिं अज्ञानतिमिरा ने लया ॥ १ ॥

## स्वागतपर पद.

मंगल दिनिं या स्वागत अपुलें ।
प्रेमें करितां मन किति धालें ॥ धृ० ॥
केले श्रम ते सुफलित झाले ।
उत्सव करुं मानस हें सजलें ॥ १ ॥
उत्तेजन तुम्हि येऊनि दिधलें ।
बाळां आम्हां उपकृत केलें ॥ २ ॥

## राजापूरकर भटजींची सफर.

आमचा गोंद्या मुंबईस गेलान्, तेसः गेलेस आज नऊ महिने झाले. एक पत्र—करड कीं काय उघडें असतें तें—पाठवलेन्. त्यांत लिहिलेन्, मस शाई घोंटण्याची चाकरी लागली आहे. घरांत तिणेंन् तर माझा जीव खाल्लान्! गोंद्याचें पत्र नाहीं, गोंद्याचा समाचार नाहीं, कुठें पडला, गाडीखालीं गावला, लहान पोर तो, तुम्ही जाऊन तरी या!

पण मस काय ठाऊक मुंबईस जावें तें. तिणेन् शेजाऱ्यापाजाऱ्यांस जाऊन विचारलेन् मुंबईस जावें कसें ? त्याणेंन सांगितलेन्, जैतापुरास जावें, बोटींत बसावें, म्हणजे मुंबई ! ती अयकेचना मुळीं ! शेवटीं बरेंचसें फराळाचें, पंचा, धावळी असें सामान पडशींत घालून आलों जैतापुरास; तों मारे ही गर्दी ! अरे जातां तरी कुठें ? जो तो म्हणे मुंबईस ! मी आपला बसलों, अन् पंचपात्री काढून पाणी पिण्यास जाणार तों घांट वाजली. मस वाटलें, आग लागली ! जो तो म्हणे बोंट आलें. इतक्यांत आमचे बगाजीपंत भेटले, म्हणून बचावलें हो. बगाजीपंत म्हणे भटजी, तिकट काढलेन् काय ? अरे तिकट तें रे कसलें ? तो म्हणे, दीड रुपाया द्या, म्हणजे मीच तें काढून आणतों. चवल्या, पावल्या, पैसे, पया मिळून जेमतेम दीड रु. ची भर करून दिली बगाजीपंताजळ. त्याणेंन् जाऊन तिकट का काय तें आणलेन्; बघतों तों आपला येवढासासा हिरवा जाड कागद ! अरे, आमच्या गांवचे मास्तर दिडकीस चारचार कागद देतात, अन् हा दीड रु. चा एवढा-साच कागद ! बरें, त्यावर पुष्कळसें लिहिलेलें तरी ! बारीक बारीक एवढेसें कायसेसें लिहिलेलें. मस तें वाचतां पण येय ना. इतक्यांत बगाजीपंत म्हणे भटजी, चढा होडींत. चढलों, तों शेजारीं धानवलचा विठ्या म्हार ! अरे बगाजीपंत, हा रे काय भ्रष्टाकार ! तो म्हणे असेंच. अरे असेंच काय डोंचकें ! इतक्यांत बोंट का काय तें आलें, अन् आपलें ओरडायासच लागलें ! मस वाटलें, भूतबीत आलें ! बगाजीपंत, मी नायरे यायचा बोटींत ! अरे हा रे काय धूर ! आमच्या पडावांत चूलसुद्धां पेटवीत नाहींत, अन् हें आगबोंट पेटलेंच तर ! तो अयके-चना मुळीं. त्याणेंन् मस खेंचून घेतलेन् वर; इतक्यांत तें बोट आपलें पुन्हा ओरडलें, अन् गाड गाड करीत चालायास लागलें. मग मी बसलों, अन् मस एक शंका सुचली. अरे, पाण्यावर खिळा टाकला, तर तो बुडतो, अन् हें लोखंडाचें घर रे कसें तरतें ? बगाजीपंतास सुद्धां

माघ २०७

सुचेना; पण मस सुचलें. अरे तें इंग्रेजानें केलें. त्यास आहे रामाचा वर, रामाच्या वरानें दगड सुद्धां तरले, अन् त्यानेंच हें तरलें! इतक्यांत बोट लागलें हालायास ! आपलें अस्सें, अस्सें होई ! ( हावभाव करून दाखविलो ) मस वाटलें, मरतों ! आमची ती राहिली कोंकणांत, गोंद्या राहिला मुंबईस, अन् लोक लागले खायास ! अरे अत्तां मरणार नी खातां काय ! पडशी घेतली पोटाशीं अन् बसलों जागत; तों उजाडलें. बोट लागलें दगडास. जो तो म्हणे, आली मुंबई. अरे काय ती मुंबई ! किड्यासारखें माणूस ! जो तो आपला मजकडे पाही. अरे मजकडे काय पाहतां ? तुम्हींच काय ते माणूस अन् मी काय माणूस नव्हे ? एकास विचारलें, आमचा गोंद्या तूस ठाऊक आहे काय ? तो म्हणे नाहीं. अरे आमचा गोंद्या राजापूरचा, त्यास सगळें राजापूर ओळखतें राजापूर ! शेवटीं वगाजीपंतानें मस घेतलेन्, अन् गोंद्याच्या बिऱ्हाडांत आणून सोडलेंन्. वरें आहे, येतों नमस्कार.

---

# कृष्णशास्त्री महाशब्दे वैद्यराज.

आमचा गोंद्या दोन्ही सांज भाताचा एवढा मोठा डोंगर खाऊन गांवभर पोळासारखा हिंडूं लागला. आतां याचें करावें काय, अशी पंचाईत पडली. कारव्यास म्हटलें, पुण्यामुंबईकडे जाऊन रोजगार तरी पाहा. पण त्या मैंदाला रोजगार कसला कपाळाचा मिळणार ! मीच परता पुण्यास जाऊन गोंद्यास धंदा पाहावा, असा विचार केला; अन् केली पडशी तयार. इवले पहूं अन् दोन नारळ त्या वाशा आपल्याच्या माडावरले काढले, आणि परता पायवाटे पुण्यास आलों. गांवांत चार दिवस फिरलों, पण गोंद्याच्या सोईचा धंदा गावेचना ! आतां करावें काय, म्हणून उगीचच रस्त्यांत भटकूं लागलों. तों भिंतविरल्या एका कागदांत आमच्या कापद्रापोलींचा कृष्णा साठा बसलेला ! मोठें चक्री-

दार पागोटें, शालजोडी नी डोळ्यांस चष्मा ! हत् तुझें फुटलें कपाळ ! अरे, शालजोडी नी पागोटें, तुला रे कोणीं दिलेंन् ? तुझ्या डोकीचा तो पंचा रे काय झाला ?" असें मी त्यास विचारूं लागलों. तों वाटेचा एक वाटसरू मस म्हणाला "भटजी, ती कृष्णशास्त्री पुढीवाले शिणोलीकर यांची रामबाण औषधांची जाहिरात आहे." हत् त्याचें फुटलें कपाळ ! अरे, एवढा पराक्रमी राम, अन् त्याचा बाण याच्यासारख्या रडतोंडयाच्या हातीं रे कसा आला ? असें मीं त्यास विचारलें. बोलतां बोलतां त्या वाटसराची ओळख निघाली ! आमच्या गांवचा राघू बरवा—त्याची बायो याच्या गांवांत दिली होती. तेव्हां मग दिलाच मी त्याच्या घरीं चार दिवस तळ ! पैसे दिले म्हणजे वर्तमानपत्रांचे मालक आपल्या पत्रांत खराखोटा वाटेल तो मजकूर अगदीं पहिल्या पानावरसुद्धां छापून देतात, असें मस कळलें. झालें ! माझें काम झालें, असें वाटलें ! मी तडक कोंकणांत आलों आणि गोंद्यास रोजगार मिळाला, असें आमच्या गोला सांगितलें. पण आमचा गोंद्या कृष्णशास्त्री कसा होणार ? ही जबरदस्त काळजी मस पडली ! गोंद्यास आत्तां कृष्णशास्त्री म्हटलें, तर त्याच्या बापसाची काय धास्ती आहे ? असें तिणेंन् मस विचारलेंन्. झालें ! लख्कन् डोंचक्यांत प्रकाश पडला ! लगेच गोंद्यास सजवून त्याची तसवीर काढविली. आणि दौतलेखणी घेऊन अजब गुणकारी वनस्पतींचीं औषधें, रातांधळें, चातुर्थिक हींव, सर्पदंश, महारोग खात्रीनें बरे करूं; म्हाताऱ्यांचे रोग पळवून लावूं ; स्त्रियांचे सर्व विकार निमिषार्धांत नामशेष करूं, वगैरे वैगेरे मजकूर; मात्रा, रसायनें, अंजनें पाक, भस्में यांची यादी आणि शेवटीं वैद्यशास्त्राची दुर्दशा उडाली आहे, भलभलते लोक त्यांत घोटाळे घालूं लागले आहेत; तेव्हां सावध असा, भपकेदार जाहिरातींना फसूं नका, असा स्पष्ट इषारा दिला; आणि जाहिरात पुरी करून दिली पाठवून त्या वर्तमानपत्राच्या मालकाकडे. तेव्हांपासून वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री कृष्णशास्त्री महाशब्दे

शिपोशीकर वैद्य यांच्या नांवानें एकसारखीं पत्रें यायला लागलीं ! सांजसकाळ मिळून रोजची १५।२० रु. ची मागणी होत असते ! कां आहे कीं नाहीं धंदा ! बरें, येतों आतां नमस्कार ! कधीं आमच्या शिपोशीकडे आलांत, तर भेटून जात जा !

**मनोरंजन मासिक** ( थोडा फेरफार करून )

---

# फुलांचा संवाद.

गुलाबः—गुलाब माझें नांव केवढें त्रिभुवनिं साऱ्या गाजतसे । सर्व फुलांमधिं मध्यपदातें आत्मगुणांनीं सजवितसें ॥ मला कशाला परवा तुमची दूरचि व्हारे दूरचि व्हा । सर्व मिळोनी गर्व त्यजोनी श्रेष्ठपणा मज तुम्हि द्यावा ॥ १ ॥

शेवंतीः—शेवंती मी सुंदर कितितरी असतां गोष्टी वदसि अशा । धीटपणा हा काय गुलाबा लपव पाकळ्या अतां कशा ॥ पीतधवलशा अमित पाकळ्या पाहुनि माना तुम्हि लववा । सर्व मिळोनी गर्व त्यजोनी श्रेष्ठपणा मज तुम्हि द्यावा ॥ १ ॥

सोनचाफाः—सुवर्णचंपक नांव विसरुनी बडबड करितां हें बघुनी । मूर्खांनो मज हसूं येतसे लवकरि काळें जा करुनी ॥ तुमचा राजा मीच शोभतों अभिषेकातें मज करवा । सर्व मिळोनी गर्व त्यजोनी श्रेष्ठपणा मज तुम्हि द्यावा ॥ १ ॥

जाईः—दर्प दरवळे उग्र तुझा किति नाजुकपण मुळिं तुजसि नसे । चांफ्या कसला गर्व वाहसी बघ जाईचें रूप कसें ॥ मधुगंधाचा लाभ सकलही संतत माझा तुम्हि घ्यावा । सर्व मिळोनी गर्व त्यजोनी श्रेष्ठपणा मज तुम्हि द्यावा ॥ १ ॥

पारिजातकः—तुमच्या एकाच्याही अंगीं मोहक गुण-गण नच दिसला। पारिजात हा म्हणुनी देवें स्वर्गांतुनियां पाठविला । पुष्प-राज मज यास्तव मानुनि वाद फुलांनो झणिं मिटवा । सर्व मिळोनी गर्व त्यजोनी श्रेष्ठपणा मज तुम्हि द्यावा ॥ १ ॥

बकुळीः—हात लावितां कोमेजुनियां दुर्गंधाचें गृह होसी । बकुळीपुढती पारिजातका फुकट दिमाखा किति करिसी ॥ दृढ-प्रेमाचें स्थान मीच रे राणी अपुली मज म्हणवा । सर्व मिळोनी गर्व त्यजोनी श्रेष्ठपणा मज तुम्हि द्यावा ॥ १ ॥

बागेचा मालकः—नका नका रे भाडूं तंडूं वाद जगीं या नच बरवा । चला चला या एकवटोनी सत्कार्यीं निज-गुण लावा ॥ सर्वांठायीं सद्गुण कांहीं परमेशानें ठेवियले । कोणी कोणां तुच्छ मानणें यास्तव नच रे मुळीं भलें ॥ १ ॥

सर्व फुलेंः—हे खरें, बोलती बरें, वागुं तेविं रे, चला एक होऊं । दृढ प्रेम धरुनि मानसीं जनां सुख देऊं ॥ सुकुमार बनवुं या हार, शोभवूं फार, या सुजन-कंठा । सोडुनी देउं या क्षणीं भांडणें तंटा ॥ अम्हि मुलें, मानवी फुलें, तोषवूं कुलें आपअपुलीं । सद्बुद्धि धरुनि सर्वदा करूं कृति चांगली ॥ १ ॥

—मनोरंजनांतून फेरफार करून

———— -

वाचन नं. २०३ नं. ........

# ज्योतिषाचा धंदा.

**धोंडूः**—काय सांगूं गणू ! मीं कांहीं कमी मेहेनत केली नाहीं. कर कर अभ्यास करीत होतों, पण बेटी एक परीक्षा पास होईल तर शपथ ! शेवटीं बाबांनीं कंटाळून मला वर्तमानपत्राचा धंदा काढून दिला; पण तेथेंही, माझे तीन तेरा नी नऊ बारा झाले ! आतां करावें तरी काय ? बाबांनीं साफ सांगितलें आहे कीं, "तूं आतां घरांत राहूं नको."

**गणूः**—धोंडू. तूं मुळींच काळजी करूं नकोस. तूं ज्योतिषाचा धंदा काढ ज्योतिषाचा. त्यांत तुला अशी कांहीं किफायत होईल कीं, तुझे बाबा तुझें ऐश्वर्य पाहून मागं येतील मागं !

**धोंडूः**—गणू, अशी थट्टा काय बरं करतोस ? अरे, घोकंपट्टी कर करून दमलों, तरी माझी एक परीक्षा पास होईना; आणि म्हणे ज्योतिषाचा धंदा काढ ! अरे हें मला साधेल तरी कसं ! मला का ती विद्या येणार आहे ?

**गणूः**—ऊं! अरे त्याला कशाला हवी विद्या ! आंगांत थोडा धूर्तपणा असला कीं, माणसाला सहज ज्योतिषी होतां येतं. पंचांगाचीं थोडीं पानं चाळावीं, बारा राशी पाठ म्हणत बोटं घालावीं, सत्तावीस नक्षत्रांचा घोष करावा आणि कांहींतरी आंकडे मोडून ग्रहांच्या गती ठरविण्याचं अवसान आणावं ! म्हणजे लोकांवर छाप पडलीच म्हणून समज. बाकी, भाकीत करायला या गोष्टींपेक्षां धूर्तपणाच अधिक उपयोगीं पडतो; आणि तूं कांहीं कमी धूर्त नाहींस !

**धोंडूः**—गणू, तूं खरोखरच माझी थट्टा चालविली आहेस. अरे, नुसत्या धूर्तपणाच्या पुंजीवर मला ज्योतिषी व्हायला सांगून, एकदां झाली, तशी पुन्हा माझी फजिती करण्याचा विचार दिसतो आहे तुझा.

**गणूः**—छे छे ! धोंडू, तसं मुळींच नाहीं. मी तुला अगदीं खरंच

सांगतों कीं, तूं ज्योतिषी हो. धूर्तपणाच्या जोरावर भाकितं कशीं करावीं, हें पाहिजे तर मी तुला सांगतों.

**धोंडू:**—सांग पाहूं.

**गणू:**—हें पहा, ज्या काळासंबंधानं तूं भाकीत करणार असशील तो नजिकचा असला, तर धोरण ठेवून तानमान पाहून तुला नाना प्रकारचीं भाकितं सहज करतां येतील; आणि तीं भाकितं खरीं झालीं, म्हणून तुला लौकिक व पैसा मिळवितां येईल. पहा, उद्या तूं असं भाकीत केलंस, कीं या शाळेंतील बरींचशीं मुलं पास होऊन कांहीं थोडीं नापास होतील; तर हें तुझं भाकीत खोटं ठरावयाचा मुळींच संभव नाहीं.

**धोंडू:**—खरंच. कोणत्याही शाळेंत कोणत्याही वर्षीं थोडीं तरी मुलं नापास होणारच. तेव्हां हें भविष्य खोटं ठरण्याचा कधींच संभव नाहीं.

**गणू:**—आतां कसं बोललास ! अरे या धूर्तपणाच्या पुंजीवर याच्या-सारखीं कितीतरी भाकितं तुला करतां येतील. उदाहरणार्थ, मुंबई शहरांत अपघातानं यंदा बरींच माणसं दगावतील, किंवा हिंदुस्थानांत एकाद्या राजघराण्यांतील पुरुषावर कांहीं तरी अरिष्ट येण्याचा संभव आहे; असलीं भाकितं बेधडक ठोकून देण्यास काय हरकत आहे ?

**धोंडू:**—खरंच ! तूं म्हणतोस तें कांहीं खोटं नाहीं. असलीं भाकितं नेहमींच खरीं होणार !

**गणू:**—आणि ज्या काळासंबंधानं भाकीत करायचं, तो जर का लांबचा असला, तर एवढीही सावधगिरी बाळगण्याचं कारण नाहीं. तुझ्या मनाला येतील तीं भाकितं छातीठोकपणानं तूं करीत सुटलास, तरी तीं कुणाच्या देवालाही खोटीं ठरवितां येणार नाहींत. कारण, त्या वेळीं भाकीत करणारा व ऐकणारा त्याचा खरेखोटेपणा ठरविण्यास मुळीं जिवंतच असणार नाहीं ! उदाहरणार्थ, आजपासून पांचशें वर्षांनीं पृथ्वीचा आकार वाटोळा आहे तो बदलून चौकोनी होणार आहे; किंवा

आजपासून हजार वर्षांनीं पृथ्वीवर आंगठयाएवढालीं माणसं होणार आहेत, असलीं भाकितं तूं खुशाल करीत जा. तीं कधींच खोटीं ठरणार नाहींत. बिनचूक भाकितं करणारा ज्योतिषी म्हणून तुझा एकदां लौकिक झाला, म्हणजे पैशाला रे काय कमी ?

**धोंडूः**—हा धंदा चांगला दिसतो आहे खरा. तेव्हां पाहतों आतां नशिबाची परीक्षा. एक जागा घेऊन दारावर " धोंडदेवशास्त्री ज्योतिषी तारापूरकर " अशी पाटी लावतों व आजच्याच मुहूर्तावर प्रारंभ करतों.

**गणूः**—ठीक, ठीक ! अरे असा धीर धर, म्हणजे आत्तां नशीब काढशील. पण हें पहा, जुनीं पंचांगं, कांहीं जुन्या पत्रिका, पाटी-पेन्सिल, कांहीं फाटक्या पोथ्या हें साहित्य घेण्यास मात्र विसरूं नकोस हो. कारण, लोकांवर छाप पडण्यास त्यांची फार मदत होते; आणि या धंद्यांत लोकांवर छाप ठेवल्याशिवाय पैसा मिळण्याची आशाच नको.

**धोंडूः**—त्याची नको काळजी. तें मी सारं नीट करतों. पण तसं कशाला, हा आत्तांच मी बाजारांत जातों, आणि या उद्योगाला लागतों.

[ **सुदाम्याचे पोहे** ] ( फेरफार करून )

---

# मिळकतीपेक्षां कमी खर्च करा.

**रामजी पाटीलः**—रामराम जानपाटील ! आज इकडे कुणीकडे ? तुमच्या गांवची खबर कशी काय आहे ? यंदा तर काय आबादानीच असेल !

**जानपाटीलः**—खरंच रामजी पाटील, यंदा पिकं बरीं आहेत व चोराचिरटांचाही त्रास नाहीं. अहो, पावसानं वेळेवर कृपा केल्यावर आबादानी कां नाहीं होणार ? पण ह्या कर्जापायीं बघा रामजी पाटील, मी अगदीं जेरीस आलों आहें.

**राम०:**-याला कोण काय करणार ? आपण होऊन कर्ज करायचं आणि मग असं रडत बसायचं, याला कोण काय करणार ?

**जान०:**-छे हो ! कर्ज काढल्याशिवाय कां कुठं चालत असतं ? पण हे सावकार बघा अगदीं चोर आहेत ! चोरसुद्धां पुरवले, पण हे साकसुरत दरवडा घालणारे सावकार नकोत. अहो, हे मुळीं घरदार, गुरंढोरं, कामधंदा कांहीं एक सुचूं देत नाहींत !

**राम०:**--जानपाटील, तुमच्या बोलण्याचा मला मोठा चमत्कार वाटतो ! काय सावकाराजवळ फौजफाटा आहे, का ते रात्रीं दरवडे घालतात, करतात तरी काय कीं त्यांच्यापायीं तुम्ही अगदीं जेरीस आलां ?

**जान०:**—परदुःख शीतळ आहे रामजी पाटील ! अहो, तो आमच्या गांवचा सावकार आहे ना माहीत तुम्हांला ? त्याचा बाप माझ्या देखत आपल्या मुलखांतून आला; तेव्हां बघा कुठं आठ चार आण्यांचा हिंग बिंग असा काहीं माल पोत्यांत घालून फेरी करीत असे. पुढं चार दिवसांनीं माझ्याच पडवींत दुकान घातलं. होतां होतां देणं घेणं करूं लागला. तो बघा माझ्या त्या नांदत्या घराचा मालक होऊन कीं हो बसला ! मलाच नव्हे तर आमच्या साऱ्या गांवाला त्यानं अगदीं पिळून काढलं ! मेला तर पोराला केवढी दौलत ठेवून गेला ! ही एवढी दौलत कोठून आली हो ! काय याचे बाप आजे कुठं स्वारीशिकारीला गेले होते, कां घरांत कांहीं पुरून ठेवलं होतं ते बाहेर काढलं, केलं तरी काय ? हा त्यांचा छळ कोठवर सोसावा बरं पाटील ? तरीसुध्दां सोसतोंच ! पण जेव्हां गुरांढोरांवर नाहीं तर घरांदारांवर येऊन ठेपतं, तेव्हां मात्र जीव राहात नाहीं ! त्याचा मुलगा पाहिला, तर तोही बापसे बेटा सवाईच !

**राम०:**—एकूण सावकार म्हणजे तुम्हांला लुटावयलाच आले आहेत म्हणना !

 काव्य नं. २०

**जान०:**—दुसरं काय तर !

**राम०:**—कांहो जानपाटील, तुमच्या ह्या आतांच्या सावकाराला उद्यां आम्हीं आमच्या गावांत राहाण्यासाठीं घेऊन गेलों, तर तुमची कांहीं हरकत आहे का ?

**जान०:**—हा तर आमच्यावर मोठा उपकारच होईल ! हरकत आहे का म्हणून काय विचारतां ? पण ही उद्यांची पट्टी होऊं द्या वरं कां पाटील ?

**राम:**—कांहो ! पट्टी भरायला सावकार कशाला ?

**जान०**—तर ? आतां आमच्यापाशीं काय आहे ! परवांच पोराचं लगीन केलं, त्यांत शिल्लक संपून वर थोडं देणंच झालं. आमचं शेतकरी लोकांचं हें असंच ! किती आबादानी असली, तरी पट्टीचे पैसे भरायला कोणीतरी सावकारच उभा करावा लागतो; आणि आमच्या गांवच्या सावकारावांचून दुसरा कोण सावकार आम्हांला आपल्या दाराशीं उभा राहूं देणार ?

**राम०:**—जानपाटील, स्पष्ट बोलतों राग मानूं नका. आपल्या पोराचं लग्न एवढया थाटानं कशालाहो केलंत ? आजूबाजूच्या १०।५ गांवकऱ्यांना मेजवान्या देऊन तुम्हीं काय मिळविलंत? दागदागिने व कपडालत्ता यांची ज्यांना खैरात वाटलीत, ते तुमचे सोयरेधोयरे किंवा इष्टमित्र आले आणि गेले ! वेळेला त्यांतला कोणी येणार आहे कां ? घरांतल्या शिलकी धान्याचा निष्कारण फन्ना उडवून वर आणखी हजारपांचशें रु. कर्ज काढलंत व खोटा डामडौल मिरविलात. यामुळं तुमचा कोणता फायदा झाला ? असल्या शेंकडों गोष्टींत आजपर्यंत तुम्हीं आपल्या पैशाचा चक्काचूर उडवीत गेलांत ! आतां तरी सावध व्हा. पाटील, मी सुद्धां तुमच्यासारखाच पोकळ डामडौलाच्या बडेजावींत आनंद मानीत होतों; आणि त्या पायीं शेवटीं असाच कर्जांत बुडालों व सावकाराच्या नांवानं खडे फोडूं लागलों; पण ऐन वेळीं मला एक उत्तम गुरु भेटला. त्यानं

**राम०**:-याला कोण काय करणार ? आपण होऊन कर्ज करायचं आणि मग असं रडत बसायचं, याला कोण काय करणार ?

**जान०**:-छे हो ! कर्ज काढल्याशिवाय कां कुठं चालत असतं ? पण हे सावकार बवा अगदीं चोर आहेत ! चोरसुद्धां पुरवले, पण हे साकसुरत दरवडा घालणारे सावकार नकोत. अहो, हे मुळीं घरदार, गुरंढोरं, कामधंदा कांहीं एक सुचूं देत नाहींत !

**राम०**:--जानपाटील, तुमच्या बोलण्याचा मला मोठा चमत्कार वाटतो ! काय सावकाराजवळ फौजफाटा आहे, का ते रात्रीं दरवडे घालतात, करतात तरी काय कीं त्यांच्यापायीं तुम्ही अगदीं जेरीस आलां ?

**जान०**:—परदुःख शीतळ आहे रामजी पाटील ! अहो, तो आमच्या गांवचा सावकार आहे ना माहीत तुम्हांला ? त्याचा बाप माझ्या देखत आपल्या मुलखांतून आला; तेव्हां बवा कुठं आठ चार आण्यांचा हिंग बिंग असा कांहीं माल पोत्यांत घालून फेरी करीत असे. पुढं चार दिवसांनीं माझ्याच पडवींत दुकान घातलं. होतां होतां देणं घेणं करूं लागला. तो बघा माझ्या त्या नांदत्या घराचा मालक होऊन कीं हो बसला ! मलाच नव्हे तर आमच्या साऱ्या गांवाला त्यानं अगदीं पिळून काढलं ! मेला तर पोराला केवढी दौलत ठेवून गेला ! ही एवढी दौलत कोठून आली हो ! काय याचे बाप आजे कुठं स्वारीशिकारीला गेले होते, कां घरांत कांहीं पुरून ठेवलं होतं ते बाहेर काढलं, केलं तरी काय ? हा त्यांचा छळ कोठवर सोसावा बरं पाटील ? तरीसुध्दां सोसतोंच ! पण जेव्हां गुरांढोरांवर नाहीं तर घरांदारांवर येऊन ठेपतं, तेव्हां मात्र जीव राहात नाहीं ! त्याचा मुलगा पाहिला, तर तोही बापसे बेटा सवाईच !

**राम०**:—एकूण सावकार म्हणजे तुम्हांला लुटावयलाच आले आहेत म्हणना !

**जान०**:—दुसरं काय तर !

**राम०**:—कांहो जानपाटील, तुमच्या ह्या आतांच्या सावकाराला उद्यां आम्हीं आमच्या गावांत राहाण्यासाठीं घेऊन गेलों, तर तुमची कांहीं हरकत आहे का ?

**जान०**:—हा तर आमच्यावर मोठा उपकारच होईल ! हरकत आहे का म्हणून काय विचारतां ? पण ही उद्यांची पट्टी होऊं द्या बरं कां पाटील ?

**राम**:—कांहो ! पट्टी भरायला सावकार कशाला ?

**जान०**—तर ? आतां आमच्यापाशीं काय आहे ! परवांच पोराचं लगीन केलं, त्यांत शिल्लक संपून वर थोडं देणंच झालं. आमचं शेतकरी लोकांचं हें असंच ! किती आबादानी असली, तरी पट्टीचे पैसे भरायला कोणीतरी सावकारच उभा करावा लागतो; आणि आमच्या गांवच्या सावकारावांचून दुसरा कोण सावकार आम्हांला आपल्या दाराशीं उभा राहूं देणार ?

**राम०**:—जानपाटील, स्पष्ट बोलतों राग मानूं नका. आपल्या पोराचं लग्न एवढया थाटानं कशालाहो केलंत ? आजूबाजूच्या १०।५ गांवकऱ्यांना मेजवान्या देऊन तुम्हीं काय मिळविलंत ? दागदागिने व कपडालत्ता यांची ज्यांना खैरात वाटलीत, ते तुमचे सोयरेधोयरे किंवा इष्टमित्र आले आणि गेले ! वेळेला त्यांतला कोणी येणार आहे कां ? घरांतल्या शिलकी धान्याचा निष्कारण फन्ना उडवून वर आणखी हजारपांचशें रु. कर्ज काढलंत व खोटा डामडौल मिरविलात. यामुळं तुमचा कोणता फायदा झाला ? असल्या शेंकडों गोष्टींत आजपर्यंत तुम्हीं आपल्या पैशाचा चक्काचूर उडवीत गेलांत ! आतां तरी सावध व्हा. पाटील, मी सुद्धां तुमच्यासारखाच पोकळ डामडौलाच्या बडेजावींत आनंद मानीत होतों; आणि त्या पायीं शेवटीं असाच कर्जांत बुडालों व सावकाराच्या नांवानं खडे फोडूं लागलों; पण ऐन वेळीं मला एक उत्तम गुरु भेटला. त्यानं

मला चार हिताच्या गोष्टी सांगून बारीकसारीक सर्व गोष्टींतला माझा अवास्तव खर्च कमी केला आणि काटकसर करायला शिकविलं. त्यामुळं बघा, मी आज अतिशय सुखी आहें. पांच वर्षांपूर्वीं ह्या कर्जापायीं मला माझा जीवसुद्धां नकोसा झाला होता ! तो महात्मा जर मला न भेटता, तर मी आज ह्या जगांत कदाचित् दिसलोंही नसतों. तेव्हां पाहा आणि विचार करा. लग्नकार्यापायीं किंवा दुसऱ्या अंशाच कामीं होणारा अवास्तव खर्च कमी करा, व्यवस्थेनं वागा, काटकसरीनं खर्च करा, म्हणजे कर्ज कर्ज घेऊन काय बसलांत, त्यांतून आत्तां मोकळे व्हाल.

जान०:—खरं आहे पाटील ! आपल्याला तो महात्मा गुरु भेटला, तसे आपण मला गुरूच भेटलांत. ह्यापुढें आपल्या वागणुकीचा कित्ता डोळ्यापुढं ठेवून मीही तसाच वागत जाईन.

पटवर्धनकृत मोडी तिसरें पुस्तक (फरक करून.)

---

## स्वागतपर पद.

मंगल दिन हा आजि उगवला ।
शिशुगण बहु आनंदें नटला ॥ ध्रु० ॥
पारितोषिकोत्सव आम्हांला ।
उत्तेजन दे कर्तव्याला ॥ १ ॥
तोष जाहला आपण येउनी ।
समारंभ हा भूषित केला ॥ २ ॥

## पराचा कावळा.

गणपतराव—कायहो विनायकराव, गांवांतलीं बहुतेक माणसं घाई-घाईनं आज त्या रामभाऊ सरवड्यांकडे काय म्हणून जात आहेत?

बऱ्याच जणांना मीं विचारलं, तों रामभाऊ सरवटे, ओकारी, काळे कावळे, तीन, असले तुटक शब्द माझ्या कानीं पडले. हें आहे तरी काय ?

**विनायकराव**—अहो, त्या रामभाऊ सरवट्यांच्या ओकारीवाटे तीन काळे कावळे पडले ! आणि हा असंभवनीय प्रकार पाहाण्यासाठीं हजारों लोक त्यांच्या घराकडे चालले आहेत !

**गण०**—तर मग अशा भयंकर प्रसंगीं रामभाऊंच्या घरच्या मंडळींना धीर देणं जरूर आहे ! पण एवढा भयंकर प्रसंग घडून आल्यावर ते जिवंत तरी कसचे राहाणार ! तरी पण त्यांच्या माणसांना चार समाधानाच्या गोष्टी सांगणं आपलं कर्तव्य आहे. बिचारा फार चांगला माणूस होता ! पण ते अजारीबिजारी असल्याचं कधीं ऐकलं नाहीं !

**विना०**—अहो, कसलं अजारपण घेऊन बसलांत ! हा देह म्हणजे घटकेचं घड्याळ आहे. तें केव्हां बंद पडेल, याचा काय नेम आहे ?

**गण०**—पण कायहो, हें तुम्ही स्वतः पाहिलं काय ?

**विना०**—तुम्ही तरी फारच संशयी बुवा ! अहो स्वतः कशाला पाहिलं पाहिजे ! आमच्या शेजारीं परांजपे वकील आहेत ना ? ते स्वतः पाहून आले व त्यांनीं मला ही बातमी सांगितली. बरं आहे, येतों.

( विनायकराव जातात व परांजपे वकील येतात. )

**गण०**—नमस्कार वकीलसाहेब. कायहो वकीलसाहेब, रामभाऊ सरवट्यांच्या उलटीवाटे तीन काळे कावळे पडले ही बातमी तुमच्या विनायकरावांनीं सांगितली, ती खरी कीं काय ?

**वकील**—काय तीन ? छे, भलतंच ! रामभाऊंच्या उलटीवाटे दोन काळे कावळे पडले, असं मीं त्यांना सांगितलं असतांना त्यांनीं दोहोंचे तीन केले, हा खासा न्याय !

**गण०**—बरं पण दोन कावळे पडले, हें तरी आपण स्वतः पाहिलं काय ?

**वकील**—अहो मी स्वतः कशाला पाहायला जाऊं ? आमच्याकडे तो

शंकरभट पुजेला येतो, त्यानं ही हकीकत मला सांगितली. बरं, पण मला कोर्टांत जायला उशीर होईल; तेव्हां आतां जातों.

( वकीलसाहेब जातात व शंकरभटजी प्रवेश करितात. )

**गण०**—काय शंकरभटजी, इतक्या लगबगीनं कोणीकडे चाललां ? जरा थांबा; तुम्हांला कांहीं विचारायचं आहे. त्या रामभाऊ सरवट्यांच्या उलटीवाटे दोन काळे कावळे पडले, असं त्या परांजपे वकिलांना तुम्ही सांगितलंत, तें खरं कीं काय ?

**शंकरभटजी**—वा ! एक कावळा पडला असं सांगितलं असतांना त्यांनीं तुम्हांला दोन सांगितले आं ! ह्या वकील लोकांना एकाचे दोन करून सांगण्याची भारीच खोड आहे बुवा !

**गण०**—पण एकाबद्दल तरी तुमची खात्री आहे ना ? का दृष्टि-भ्रमच झाला ?

**शंकर०**—अहो दृष्टिभ्रम कसला ! आमचे ते डॉ० गोपाळराव त्यांना तपासायला गेले होते व त्यांनीं ही समक्ष पाहिलेली गोष्ट मला सांगितली.

**गण०**—एकूण तुम्हीं कांहीं हा प्रकार प्रत्यक्ष पाहिला नाहीं तर !

**शंक०**—बाकी तो खराच असला पाहिजे ! अहो ते डॉ० उगीच कशाला खोटं बोलतील ? त्यांत त्यांना काय मिळणार ? बरं तें असो. मला श्राद्ध चालवायला जाण्यास उशीर होत आहे. येतों, नमस्कार.

[ शंकरभटजी जातात व डॉ० गोपाळराव प्रवेश करितात. ]

**गण०**—कोण डॉ० साहेब ? अगदीं वेळेवर गांठ पडली म्हणायची. रामभाऊ सरवट्यांकडून आलांत वाटतं ? आतां कशी काय आहे त्यांची प्रकृती ? अहो, त्यांच्या उलटींतून काळा कावळा पडला म्हणतात, तें खरं कीं, काय ?

**डॉ०**—काय म्हणतां ! त्यांच्या उलटींतून काळा कावळा पडला ?

आपल्याला नव्हतं बुवा हें ठाऊक ! या रोगापुढं आमचं ज्ञान अगदीं फोल ठरणार !

गण०—अहो दोनतीन नाहींत, पण एक कावळा पडला ना ?

डॉ०—वा ! कावळा का कोठें उलटींतून पडत असतो ? पण ही बातमी तुम्हांला दिली तरी कोणी ?

गण०—ते शंकरभटजी तुमच्या घरीं पुजेला येतात ना ? ते म्हणाले, डॉक्टरसाहेबांनींच ही बातमी मला सांगितली.

डॉ०—मी त्यांना असं कसं सांगेन ? रामभाऊंना काळी उलटी झाली, असं मी म्हणालों. मग त्यांनीं काळा कावळा कोठून आणला कोण जाणें !

गण०—अहो, एकाच्या तोंडून दुसऱ्याच्या व दुसऱ्याच्या तोंडून तिसऱ्याच्या कानीं ही बातमी जाऊन तो माणूस तीन कावळे पडल्याची बातमी सांगत सुटला आहे ! मी ह्या बातमीच्या खरेखोटेपणाची चौकशी करावयाला लागलों, त्यामुळं कावळ्यांच्या ह्या वाढत्या संख्येला आळा तरी बसला.

डॉ०—तरी बरं लौकरच आटोपलं म्हणायचं. तुम्ही आतांच जर ह्या चौकशीच्या भानगडींत पडलां नसतां, तर मला वाटतं, ही कावळ्यांची संख्या कांहीं वेळानं एक लक्षापर्यंत गेली असती ! व तुम्हांला वाटलं असतं कीं, त्या रामभाऊंच्या पोटांत इतक्या काव-ळ्यांना राहायला जागा तरी कशी मिळाली ! असो. आतां आपण त्या राम-भाऊंकडेसच जाऊं व त्यांना ही सारी गंमत सांगूं. त्यांची प्रकृति आतां बरी होत चालली आहे, काळजी करवयाला नको.

( जातात. )

बोथट बाण ( थोडा फेरफार करून )

---

# उशीर करणारा शंकर.

**शंकरः**—काय करावं बुवा या मास्तरांना! रोज उठून त्यांची आपली कटकट चाललेली असते. मी तर अगदीं कंटाळून गेलों. शाळेंत यायला मला थोडा उशीर झाला, तर ह्यांचं काय जातं ?

**विष्णुः**--वा! आपण अन्याय करावा आणि मास्तरांवर रागवावं, हा खासा न्याय!

**शंकरः**— काय ? मी अन्याय करतों ? शाळेंत यायला थोडासा उशीर झाला, तर त्यांत रे कसला अन्याय ? उशीर झाला कीं मुलगा काय लबाड किंवा चोर ठरतो कीं काय ?

**विष्णुः**--शंकर, नीट विचार कर. चोरी, लबाडीसारखा तुझा हा अपराध भयंकर नसला, तरी अपराध नाहीं, असं मात्र नाहीं. अगदीं क्षुल्लक असला, तरी तो अन्यायच आहे.

**शंकर**—कसला अन्याय नी कसलं काय! धरला तर अन्याय, नाहीं तर कांहीं नाहीं. तूं कांहीं म्हण, पण असल्या या क्षुल्लक गोष्टींत मास्तरांनीं कटकट करणं मला मुळींच आवडत नाहीं.

**विष्णुः**—क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींचेही पुढं फार भयंकर परिणाम होतात. ह्या तुझ्या संवयीनं प्रत्यक्ष तुझं आणि वर्गांतल्या इतर मुलांचं किती नुकसान होतं, तें तुला कळत नाहीं. मलासुद्धां तुझ्यासारखीच ही भिकार संवय लागली होती; पण मी आतां ती साफ टाकून दिली आहे.

**शंकरः**--बरं, पण मी तुला असं विचारतों कीं, जेव्हां ही संवय तुला लागली होती, तेव्हां तुझं कितीसं नुकसान झालं ? आणि आतां ती टाकल्यानं तुझा कोणता फायदा होत आहे ?

**विष्णुः**—ज्या दिवशीं मला शाळेंत जायला उशीर होई, त्या दिवशीं वर्गांत थोडा वेळ उभं राहावं लागे; त्यामुळं सगळीं मुलं माझ्याकडे मधून मधून पाहात, त्याची मला लाज वाटे आणि चाललेल्या विषया-कडे लक्ष लागेनासं होई. शिवाय मी येण्यापूर्वीं वर्गांत झालेला भाग मला समजलेला नसल्यामुळं त्याच्या पुढचा भागही नीटसा कळत नसे; म्हणून त्या तासांतला माझा सगळाच अभ्यास कच्चा राही. असं नेहमीं झाल्यावर परीक्षेंत ठोकर बसली, तर नवल काय ? सहामाही परीक्षेंतच आम्हीं ही ठोकर खाल्ली; पण नशिबानं सावध झालों, म्हणून वार्षिक परीक्षेंत सावरलों. नाहीं तर सबंध वर्षच फुकट गेलं असतं.

**शंकरः**—तूं म्हणतोस तें खरं बावा विष्णु.

**विष्णुः**—शिवाय आपण उशिरां आलों कीं, इतर मुलांचंही नुकसान होतं. एकादा मुलगा उशिरां आला, म्हणजे त्याच्याकडे इतर मुलांचं लक्ष सहज जातं. उशीर कां झाला याबद्दल मास्तरांना चौकशी करावी लागते व त्यामुळं वर्गांत चाललेला विषय मध्येंच थांबतो; आणि हा सारा वेळ फुकट जाऊन आपलं आणि इतरांचं नुकसान होतं.

**शंकरः**—खरंच विष्णु. ही गोष्ट माझ्या ध्यानांतच आली नाहीं. उशिरा-बद्दल मास्तर मला नेहमीं बोलतात, म्हणून मी त्यांच्यावर रागावत होतों. माझी ही चुकी मला आतां कळून आली. आजपासून ही वाईट खोड मी टाकून देतों.

**( पा. ना. मिसाळ )**

---

# अश्वहरण

**ऋषिकुमार**—कुमारा लवा, घोडा घोडा म्हणून म्हणतात तो, तो आज आम्हीं प्रत्यक्ष पाहिला !

२

**लव**—घोडा ? घोडा हा शब्द कोशामध्यें पशुवर्गांत आणि युद्ध-प्रकरणांत आढळतो. बरं, तो कसा आहे रे ?

**ऋषिकुमार**—कसा आहे तें सांगूं ?

मागें पुच्छ विशाल त्यास असुनी तें सारखें हालतें ।
आहे मान सकेश, लांब, खुरही चारी पदीं चार ते ॥ १ ॥

पण तें सांगावं किती बुवा ! चल आपण जाऊनच पाहूं. (थोडें चालून) अरे तो पहा.

**लव**—पाहिला आणि समजलोंही. अरे तो अश्वमेधाचा घोडा.

**ऋषिकुमार**—तें रे कसं तुला समजलं ?

**लव**—अरे मूर्खांनो, तुम्ही त्या कांडांत नाहीं का शिकलां ? तुम्हांला दिसत नाहीं ? त्याला सांभाळण्याकरतां कवचें घातलेले, बरच्या घेतलेले व भाले धरलेले शंभर शंभर वीर आहेत ते ? मी म्हणतों हें खरं वाटत नसेल, तर जाऊन त्यांना विचारा.

**ऋषिकुमार**—अहो योधहो, हा घोडा तुम्हीं असा मोकळा कां सोडला आहे ? आणि तुम्हीं त्याच्या भोंवतीं कां ?

**लव**—हां ! अश्वमेध म्हणजे कोणा क्षत्रियानं पृथ्वींतील बाकीच्या क्षत्रियांस जिंकल्याचं हें चिन्ह होय.

( पड़द्यांत ) हा घोडा वा पताका ही शौर्याची साक्ष देतसे ।
रावणारी असा वीर साती लोकीं दुजा नसे ॥

**लव**—हे शब्द किती चीड आडणारे आहेत ! काय हो, तर मग पृथ्वींतील सर्वच क्षत्रिय मेले काय ? म्हणून असा हा घोष करतां ?

( पडद्यांत ) अरे ए, आमच्या महाराजांपुढं इतर क्षत्रियांचा पाड काय ?

**लव**—अरे जारे क्षुद्रांनो !

असती सत्यचि क्षत्रिय दाखवितां धाक काय हो मजला ।
अथवा वाद कशाला हरितों तुमच्या पहा पताकेला ॥ १ ॥

अरे ऋषिकुमारांनो, घाला या घोड्याला गराडा ! आणि ढेकळांनीं मारीत मारीत आश्रमाकडे घेऊन जा. रोहित मृगांमध्यें चरूं द्या त्या भिकारड्याला !

**एक सैनिक**--अरे, हे आडदांड, वळकट व हत्यारबंद शिपाई मुलांची म्हणून ही अशी गर्वोक्ति सहन करणार नाहींत हो ! राजपुत्र चंद्रकेतु तर शत्रूंचा काळ आहे. तर जोंवर ह्या नवीन अरण्याची शोभा पाहाण्याच्या इच्छेनं तो इकडे आला नाहीं, तोंच तुम्ही पळून त्या दाट झाडींत दडून राहा कसे !

**ऋषिकुमारः**—कुमारा लवा, पुरे बाबा हा घोडा ! आपलीं लखलखीत शस्त्रं दाखवून हे शिपाई पहा कसे दरडावीत आहेत ! येथून आश्रमही फार लांब आहे. तर चल, हरणासारखे उड्या टाकीत पळून जाऊं आपले !

**लव**—काय म्हणतां ! लखलखीत शस्त्रांनीं दरडावतात ?

दोरी जीभचि तीक्ष्ण कोटि नमिले ज्याचे तिनें प्रांत हे ।
गंभीरा करितोंहि घर्घरनदा भीतिप्रदा चाप हें ॥
मृत्यूचें मुख शोभतें उघडिलें ग्रासा त्वरें घ्यावया ।
अंतर्माग विशाल भीषण पहा देतें जणूं जांभया ॥ १ ॥

**कृष्णशास्त्री गोडबोलेकृत** (उत्तर रामचरित्र)

---

## अपराधाची कबुली

**वेणु**:—दादा, केवढयानेंरे मला धक्का दिलास ! तुझ्या धक्क्यानं माझा पाय आरशावर पडून तो फुटला ना. थांब, आतां बाबा रागावले म्हणजे मी तुझं नांव सांगेन.

**वामनः**—वेणे, उगीच खोटं बोलूं नकोस ! मी आरशाला शिवलों तरी ? तूंच पाय देऊन तो फोडलास.

**वेणूः**—दादा, असा कांगावा करूं नकोस. तूं मला ढकलून दिलंस, त्यामुळें माझा पाय आरशावर पडून तो फुटला. मी कां मुद्दाम आरशावर पाय दिला ?

**वामनः**—मी ढकलून दिलं म्हणतेस, तर तूं नाहीं कां मला ढकललंस ? तेव्हां मी नाहीं कुठं आरशावर पाय दिला ?

**वेणूः**—मी तुला मुळींच ढकललं नाहीं; आणि तुला ढकलण्याइतकं मला वळ तरी आहे कां ?

**वामनः**—तें कांहीं असो. तूं होऊनच आरशावर पाय दिलास आणि फोडलास, असं मी बाबांना सांगेन. तूं मला ढकललं नाहींस, तर मीही तुला ढकललं नाहीं.

**वेणूः**—तर मग तूं बुद्धयाच खोटं बोलणार म्हणायचा ! बोल बापडा. पण बाबांचा विश्वास कोणाचे बोलण्यावर बसतो, तें तुला दिसेलच. मी आपली जसं घडलं तसंच खरं सांगणार.

**वामनः**—पण त्यामुळें तुला मार बसेल त्याची वाट काय ?

**वेणूः**—वाट काय व्हायची ! बसला मार तर बसला. आंगणांत खेळायचं सोडून आम्ही मुलीं दिवाणखान्यांत खेळायला कां आलें ? अन्याय घडला खरं; मग शिक्षा भोगायला तयार असलंच पाहिजे.

**वामनः**—पण वेणे, आपण असं केलं तर ? अगदीं बोलायचंच नाहीं असं ठरवूं आणि मुकाट्यानं आपण येथून बागेंत खेळायला जाऊं. आरसा कोणीं फोडला कोणास ठाऊक ! जसें कांहीं आपण त्या गांवचेच नाहीं, असं वागूं म्हणजे झालं; मग कुणावरच कांहीं येणार नाहीं.

**वेणूः**—दादा, ही तुझी मसलत बरी नाहीं. खरं सांगणं हेंच उत्तम. लबाडी ही कधींना कधीं उघडकीस येणारच. हेंच पहा; आपण येथें खेळत होतों, हें सगळ्यांना ठाऊक आहे. तेव्हां आपणच आरसा

फोडला, असंच शेवटीं ठरेल. पहिल्यानं नाकबूल होऊन मग कबूल व्हावं, यांपेक्षां अगोदरच खरं सागावं, हें चांगलें नाहीं कां ?

**वामनः**—तूं म्हणतेस तें खरं वेणे. पण मला कांहीं बाबांच्या समोर उभं राहायला धीर व्हायचा नाहीं.

**वेणूः**—तर मग असं करूं. बाबा घरीं येण्यापूर्वीं आपण आईकडे जाऊं व तिच्या कानावर ही घडलेली गोष्ट घालूं; म्हणजे तीच मुळीं बाबांचा राग कमी करील.

**वामनः**—हो हो ! ही युक्ति बरी आहे; चल तर आतांच आईकडे जाऊं.

क्रमिक तिसरें पुस्तक (थोडा फरक करून).

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## ईशप्रार्थना पद.

भजन तुझें किति देवा बाळां ।
संतोषातें देइ दयाळा ॥ धृ० ॥
भाऊ वहिणी मिळुनी प्रेमें ।
गाऊं रोज तुला ॥ १ ॥
सकलारंभीं नाम तुझें हें ।
मंगलमय विमला ॥ २ ॥
आम्हां सकलां देवा असशी ।
स्नेही तूंचि भला ॥ ३ ॥

---

# गैरहजर राहाणारा मुलगा.

**गुरुजीः**—कायरे रामा, तूं काल कुठें होतास ? शाळेंत कां नाहीं आलास ?

**रामाः**—मी काल आईबरोबर पर्वतीस गेलों होतों मास्तर.

**गुरुजीः**—वडिलांची चिठ्ठी आणलीस ?

**रामाः**— नाहीं.

**गुरुजीः**—कां बरं ? चिठ्ठी आणल्याशिवाय गैरहजर राहिलेल्या मुलांना वर्गांत बसूं द्यावयाचं नाहीं, हा नियम तुला माहीत नाहीं वाटतं ?

**रामाः**—आहे माहीत. पण माझे बाबा चिठ्ठी देणार नाहींत, असं मला वाटलं, म्हणून मी त्यांच्याजवळ ती मागितली नाहीं. मी काल गैरहजर राहिलों हें त्यांना माहीतच नाहीं.

**गुरुजीः**—तर मग तूं जो आईबरोबर पर्वतीस गेलास, तो कोणास विचारून गेलास ?

**रामाः**—बाबांना विचारलं, तेव्हां ते म्हणाले शाळा बुडवून पर्वतीस जाऊं नको. पण मीं कधीं पर्वती पाहिली नव्हती म्हणून आईला विचारलं. ती 'चल' म्हणाली तेव्हां मी तिच्याबरोबर गेलों.

**गुरुजीः**—पण कायरे, तुझ्या बाबांनीं जें तुला सांगितलं तें तुझ्या आईला माहीत होतं का ?

**रामाः**—तिला माहीत नव्हतं, म्हणून तर ती मला 'चल' म्हणाली !

**गुरुजीः**—तर मग तूं मोठा लबाड मुलगा आहेस ! आज तूं फार वाईट गोष्ट केलीस. मला तुझा अतिशय राग आला आहे.

**रामाः**—पर्वती पाहिली नव्हती म्हणून मी गेलों; यांत वाईट तें काय केलं ?

**गुरुजी**:—वाईट काय केलं ? असं करून तूं दोन अपराध केलेस. वडिलांचा हुकूम मोडून आईला फसवलंस हा पहिला; आणि गैरहजर राहून शाळेंतला अभ्यास बुडविलास हा दुसरा. ह्या अपराधाबद्दल तुला चांगली शिक्षा केली पाहिजे.

**रामा**:—एक वेळ क्षमा करा मास्तर. मीं जे अपराध गेले, त्यांबद्दल मला फार वाईट वाटतं. मी पुन्हा असं कधीं करणार नाहीं.

**गुरुजी**:—बरं आहे, एक वेळ तुला क्षमा करतों. पण लक्षांत ठेव; अशा रीतीनं जर का पुन्हां शाळा चुकविलीस आणि वडील माणसांची आज्ञा मोडलीस, किंवा कोणाला फसवलंस, तर तें मला मुळींच खपणार नाहीं. जा, बस जाग्यावर.

---

# याचकोपद्रवनिवारक मंडळ.

**एक सभासद**:--सभ्य गृहस्थहो, आम्हां धर्मपुरस्थ ग्रामस्थांना याचक-चमूनें अगदीं भंडावून सोडिलें असल्यामुळें त्यांच्या हातून आमची सुटका व्हावी, व कांहीं ठराव पास व्हावे, एतदर्थ आज ही सभा मुद्दाम बोलाविली आहे. या सभेचें अध्यक्ष-स्थान आपले ग्राममान्य सकल-गुणालंकारयुक्त श्रीयुत चिकटोपंत अनुदारे हे सुशोभित करतील, आणि कांहीं योग्य ठराव पास करून आम्हां ग्रामस्थांना याचक-चमूच्या तडाख्यांतून सोडवितील, अशी आशा आहे.

**दुसरा सभासद**:--याला माझें जोरदार अनुमोदन आहे.

**अध्यक्ष**:—माझ्यापेक्षां योग्यतेनें जास्त व ही जागा मंडित करण्यास योग्य अशी मंडळी पुष्कळ असतांही मला हा बहुमान दिल्याबद्दल आपणां सर्वांचे मी आभार मानतों. आतां कोणाचाही वेळ न घेतां व विशेष पाल्हाळ न करितां वक्त्यांनीं आपापल्या भाषणांस सुरवात करावी अशी मी विनंति करतों.

**तिसरा सभासदः**—अध्यक्षमहाराज आणि ग्रामबांधवहो, दानधर्म करण्याच्या बाबतींत माझें मत पूर्णपणें नकारार्थी जरी नसलें, तरी आज सुतक आहे, उद्यां घातवार आहे, इत्यादि सबबी सांगून याचक मंडळींस मी परत पाठवितों; तेव्हां त्यांचा उपद्रव व्यक्तिशः मला कधींच होत नाहीं हें खरं आहे. पण माझें मित्र श्रीयुत वेडूनाना यांचे विचार सर्वस्वीं माझ्या उलट असून अतिथिअभ्यागतांस ते सहसा परत पाठवीत नाहींत; आणि अशा लोकांनींच बहुतेक गांव व्यापिलेला आहे. त्यांच्या घरीं नेहमीं एकादा साधू, बैरागी, गवई, कथेकरी, शास्त्री किंवा पुराणिक पडलेला असतोच. आमच्या वेडूनानांचा कुटुंब-विस्तार मोठा असून या आगांतुक पाहुण्यांची त्यांत भर पडल्यामुळें त्यांच्या श्रीमतींस स्वयं-पाकाची व इतर कामांची फार दगदग पडते; परंतु त्या विचारीला ती सारी निमूटपणें सोसावी लागते. कालगतीनें हल्लीं ही याचकचमू वाढतां वाढतां नानांच्या कुटुंबीय माणसांपेक्षांही संख्येनें जास्त झाली आहे! वेदा-ध्ययन, शास्त्राध्ययन, गायन इत्यादि गोष्टींचा त्यांच्या घरीं सारखा घोष चाललेला असतो. श्रीयुत नाना यांस हल्लीं स्वतांच्या घरांतही संकोच वाटूं लागला आहे. जेवणापुरतें घरीं जाऊन, बाकीचा वेळ ते आपल्या स्नेह्याकडे काढीत असतात. मित्रहो, लक्षांत घ्या कीं, नुसत्या पाहुण्यां-करितांच पायलीचा भात वेळेस लागतो! शिवाय पाहुणे यजमानांच्या आग्रहाची वाट न पाहतां परस्परांस आग्रह करून अन्नाची तूट पाडि-तात, ती निराळीच! शिळें अन्न, जाड तांदूळ, वाशेळें तूप, इत्यादि गोष्टी या पाहुणे मंडळीस बिलकूल खपत नाहींत! पुन्हा त्यांच्यांत अनेक पंथ व अनेक व्रतें असल्यामुळें रोजच्या रोज, निराहाराचा, धान्यफराळाचा व साध्या जेवणाचा, असे तीन स्वयंपाक करावे लागतात, आणि जेवणापेक्षां उपासालाच खर्च भारी लागतो! यासाठीं या व असल्या दगदगीचा या सभेंत विचार होऊन आमच्या भोळ्या

मित्रवर्यांना व ग्रामस्थांना याचकोपद्रवापासून मुक्त करण्यांत येईल, अशी आशा आहे.

**चौथा सभासद:**—शास्त्री, पुराणीक, कथेकरी, गवई, जादूगार, गारुडी इत्यादि मंडळींची गणना याचक मंडळींत केल्यास आपण रुष्ट होणार नाहीं, अशी मी खात्री बाळगितों. पण या मंडळींना आपल्या धंद्यासाठीं कांहींना कांहीं तयारी करावी लागते, व मोबदला देणारास ज्ञान किंवा करमणूक यांचा कांहीं तरी लाभ होतो, हें नाकबूल करितां येणार नाहीं. याचक यजमानाची स्तुति करूं लागला कीं, कित्येक यजमानांस किंबहुना मला सुद्धां आपण खरोखरीच कर्णाचे ( लंबकर्णाचे ) अवतार आहोंत कीं काय असा भास होतो ! एकदां एक भिक्षुक मजकडे आला व म्हणाला कीं, मी आपलें नांव ऐकून दूर देशांतून मुद्दाम आलों आहें. तो काशीचा राहणारा होता; इतक्या लांबीचा भिक्षुक माझें नांव ऐकून आलेला पाहून मला फार धन्यता वाटली; व मनांतल्या मनांत मीं आपल्या पाठीवर बऱ्याच शाबासक्या घेतल्या ! माझे मित्र श्रीयुत बलभीमराव हे जवळच होते, त्यांनीं त्याला माझ्या नांवाचा उच्चार करण्यास सांगितलें, तों त्या भिक्षुकरावांची पांचावर धारण बसून व माझ्या मित्राचें उग्र स्वरूप पाहून त्या बिचाऱ्याला मुकाट्यानें हात हालवीतच परत जावें लागलें ! लोंचटपणा व चिकाटी या बाबतींत तेलंग भटांचा हातखंडा आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. हे लोक उत्तम वैदिक असून वेदांच्या चिंध्या उडविण्यांत फार तत्पर असतात ! अर्थ समजण्याचें ज्ञान त्यांच्यांत मुळींच नसतें, ही गोष्ट अलाहिदा आहे. यांच्या लोंचटपणामुळें फुकट जाणाऱ्या वेळाची किंमत त्यांच्या दक्षिणेपेक्षां शतपटीनें अधिक आहे, अशी यजमानाची अखेर खात्री होऊन तो निमूटपणें त्यांची खंडणी त्यांच्या पदरांत घालतो. माझे मित्र श्रीयुत बलभीमराव यांजकडे एकदां एक याचक आला; परंतु ते

बधत नाहींत असें पाहून प्राणत्याग करण्याची तो त्यांस भीति दाखवूं लागला. तथापि ते कांहीं त्यास मुळींच दाद देईनात ! शेवटीं तो याचक विहिरींत उडी टाकण्यास गेला ! तेव्हां श्रीयुत बलभीमराव हेही त्याच्या मागोमाग गेले, व त्यांनीं त्याच्या पाठीस धोतर गुंडाळून पुन्हः पुन्हा बुचकळून वर काढण्याचा उपक्रम त्यांनीं सुरू केला ! अखेरीस पांचव्या खेपेला तो विचारा अगदीं बेदम होऊन " असा त्रागा पुन्हा करणार नाहीं " अशी त्यानें शपथ घेतली ! तेव्हां मग माझ्या मित्रवर्यांनीं मोठ्या औदार्यानें त्यास वर काढलें. कांहीं याचक धर्मसंस्थेच्या किंवा धर्मकृत्याच्या नांवाखालीं बराच पैसा उकळतात, असा अनुभव आहे. अमक्या गांवास धर्मशाळा बांधावयाची आहे, फलाण्या साधूची समाधी बांधावयाची आहे, इत्यादि सबबींवर भोळ्या लोकांकडून बराच पैसा काढून त्यावर स्वतांचा संसार उत्तम प्रकारें चालवितात, ही गोष्ट सर्व–विश्रुतच आहे. तेव्हां या याचकचमूसंबंधानें अध्यक्ष साहेबांनीं कांहीं सामान्य नियम करून आम्हां धर्मप्रस्थांना याचकांच्या तडाक्यांतून सोडवावें, अशी विनंति आहे.

**पांचवा सभासदः—** मीही स्वतांची हकीगत न सांगतां इतरांचीच सांगणार आहें. माझे मित्र श्रीयुत भिडस्ते यांच्याकडे पाहुण्यांचा फार सुळसुळाट झाला असून त्यांनीं त्यांस सळो कीं पळो करून सोडिलें आहे ! दोन महिन्यांपूर्वीं त्यांच्याकडे चार भिक्षुक, तीन पुराणिक, दोन गवई, दोन कथेकरी व एक ज्योतिषी इतके पाहुणे गोळा झाले होते ! त्यांनीं आपल्या अनियमितपणानें, भांडखोरपणानें, लोंचटपणानें व खादाडपणानें साऱ्या घरांत गोंधळ मांडिला ! गवयांच्या तानांत, भिक्षुकांच्या पाठांत आणि शास्त्र्यांच्या वादविवादांत श्रीयुत भिडस्ते यांस स्वतांचें बोलणें देखील ऐकूं येईनासें झालें ! ह्या त्यांच्या विपत्तीबद्दल मला त्वेष येऊन त्यांच्या देवडीवर आक्राळ–विक्राळ व वाऱ्याशीं भांड-

णारा असा एक चावरा कुत्रा बांधून ठेविला; पण तो कुत्रा हा घरचा आणि हा बाहेरचा असा पंक्तिप्रपंच करीत नसल्यामुळें ही युक्ति माझ्याच गळ्यांत आली! मग एके दिवशीं पांचसहा विंचू आणून ते अशा खुबीनें ठेविले कीं, त्यांनीं रात्रीच्या वेळीं पाहुण्यांस आपल्या नांग्यांचा मासला दाखवावा; व ती मजा स्वतःला पाहण्यास मिळावी, म्हणून मी एका गुप्त ठिकाणीं निजून राहिलों. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, त्या वृश्चिक–मंडळींनीं एकसमयावच्छेदेंकरून माझ्यावरच हल्ला केला! अर्थात् ही युक्ति तर मला चांगलीच भोंवली! यानंतर या खुशालचंदांस पिटाळून लावण्यासाठीं श्रीयुत भिडस्ते यांच्या अगदीं जवळच्या नातलगाच्या मृत्यूची खोटीच बातमी उठविली. ह्या नातलगाचें कधींच अस्तित्व नसल्यामुळें माझ्या मित्रवर्यांस व त्यांच्या कुटुंबांतील माणसांस दुःख करण्याचें कारणच नव्हतें! पण ह्या खोट्याच अशौच्यामुळें पाहुणे मंडळींचें उच्चाटन न होतां त्यांनीं घरांतील सर्वच कारभार आपल्या हातीं घेतला! त्यांचा प्रवेश स्वैंपाकघरांत होतांच कोनाड्यांत, रांजणांत, हंड्यांत व बरणींत काय काय चमत्कार भरले आहेत, ह्यांचा बारकाईनें शोध करून त्यांचा फन्ना उडविण्यास त्यांनीं सुरवात केली, व एका वर्षाची सामुग्री, अवघ्या दहा दिवसांतच उठविली! हा सर्व प्रकार पाहून, श्रीयुत भिडस्ते यांच्या तोंडचें पाणी पळालें आहे! या त्यांच्या कृत्रिम सुतकाला आज ११ वा दिवस आहे. तरी ह्या सभेंत पाहुण्यांची खोड मोडण्यासारखे ठराव पास करून माझ्या मित्रवर्यांची सुटका करण्याचें श्रेय अध्यक्ष—महाराज घेतील, अशी आशा आहे.

**अध्यक्षः**—सर्वांचीं भाषणें झालीं आहेत, व त्यांचा योग्य विचार करून मीं कांहीं ठराव केले आहेत; ते पास झाल्यावर या धर्मपूरस्थांनींच नव्हे, तर प्रत्येक गांवच्या लोकांनीं ते पाठ करावे, व अमलांत आणावे, अशी मी शिफारस करितों.

**ठराव १ ला:**—कोणीही ग्रामस्थानें आपल्या घरांत याचकाला सहसा बिऱ्हाड देऊं नये; दिल्यास त्याच्याकडून रोजच्या प्राप्तींतून राहण्याबद्दल रोजीं चार आणे, जेवणाबद्दल रोजीं आठ आणे आणि तितकेच भंगी-पट्टीबद्दल देत जाईन असा लेख प्रथम घेत जावा. हा ठराव ज्यांना पसंत असेल त्यांनीं हात वर करावा. कोणींही विरुद्ध नाहीं, तेव्हां ठराव पास.

**ठराव २ रा:**—याचकानें कोणाचें शिफारसपत्र आणल्यास, त्यास कोणीं कवडीसुद्धां देऊं नये. मी अमक्याच्या घरीं उतरलों आहे, हें सांगणेंही शिफारसपत्र दाखविल्यासारखेंच मानावें. या ठरावाला अनुकूल असणारांनीं हात वर करावा. कोणीं विरुद्ध नाहीं, तेव्हां ठराव पास.

**ठराव ३ रा:**—यजमान देईल त्यांत याचकानें संतोष मानिला पाहिजे; न मानल्यास दिलेली दक्षिणा परत घेतली जावी. या ठरावाला कोणाचा विरोध आहे ? ( नाहीं ) तर मग ठराव पास.

**ठराव ४ था:**—याचकानें यजमानाचा पांच मिनिटांहून अधिक वेळ घेतां कामा नये; घेतल्यास दर पांच मिनिटांमागें एक आणा याप्रमाणें दंड कापिला जावा. ( सर्वांचेच हात वर आहेत, तेव्हां हाही ठराव एक-मतानें पास. )

**ठराव ५ वा:**—एकापेक्षां अधिक याचक एकदम आल्यास पहिल्याचे निंपट दुसऱ्यास, व पाऊणपट दक्षिणा तिसऱ्यास देण्यांत यावी. यापेक्षां अधिक याचक एकदम आल्यास त्यांनीं हात हालवीत परत गेलं पाहिजे. ( ठराव पास. )

**ठराव ६ वा:**—एकच याचक एकाच यजमानाकडे वर्षांतून दोनदां गेल्यास त्याला तेथें कांहीं मिळणार नाहीं, इतकंच नाहीं तर त्याला गांवांत इतरांकडून मिळालेली दक्षिणाही त्यानं परत केली पाहिजे. ( सर्वांचे हात वर आहेत, तेव्हां ठराव पास. )

**ठराव ७ वा:**—याचकानं त्रागा करून प्राण दिल्यास त्याचं दहन

करण्याचा खर्च सर्व ग्रामस्थांनीं सोशिला पाहिजे, व त्याच्या सरणाभोंवतीं पांचजन्य करण्यास सर्वांनीं एका पायावर तयार असलं पाहिजे. ( ठराव बहुमतानें पास. )

येणेंप्रमाणें केलेले ठराव तूर्तच्या सभेंत बस्स आहेत. एवढयांनीं काय परिणाम घडतो, याचा अनुभव मिळाल्यावर जरूर पडल्यास पुढील खेपेस आणखीं कांहीं ठराव पास करून घेतां येतील.

**सहावा सभासदः**—अध्यक्षसाहेबांनीं आपला बहुमोल वेळ खर्चून जे ठराव पास केले, त्यांच्या योगानं आम्ही धर्मपूरस्थ लोक याचकचमूच्या तडाख्यांतून निःसंशय कायमचे सुटूं; तेव्हां याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. तथापि लोकाचारासाठीं सर्व ग्रामस्थांतर्फे मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

[ मधुकर थोडा फेरफार करून. ]

---

# समारोपपर पद.

येत जावें सदा भेट द्याया अम्हां ।
हीच विनति करीत छात्रगण हा तुम्हां ॥ धृ० ॥
कौतुकासी कोण करिल तुम्हांवीण ।
वाटो न हा शीण याचना ही तुम्हां ॥ १ ॥

---

# गालिच्छ आणि गबाळ मुलगा.

**रामा**—काय सदू, आज शाळेंत यायचं नाहीं वाटतं ?

**सदू**—मी नाहीं येणार आतां शाळेंत ! काल सकाळीं शाळेंत गेल्यावरोवर मास्तर मला म्हणाले, " चालता हो घरीं ! " तें तूं ऐकलं आहेसच !

**रामा**—अस्सं ! तर मग एकूण तूं मास्तरांवर रागावला आहेस म्हणायचा !

**सदू**—कां वरं नाहीं रागावणार ? शिकण्यासाठीं ना आपण शाळेंत येतों ! आज काय तोंडच धुतलं नाहीं, उद्यां काय कोटाच्या गुंड्याच तुटल्या आहेत, परवां काय सदराच घाणेरडा आहे, अशा एक ना दोन, शेंकडों गोष्टींबद्दल मास्तरांची पिरपीर आपली नेहमींच चाललेली असते ! माझी आईसुद्धां असं म्हणत होती कीं, ह्या शाळेंतल्या मास्तरांना असल्या गोष्टींची उठाठेव कशाला हवी ? तूंच सांग वरं ! मास्तरांचं हें करणं तुला योग्य वाटतं का ?

**रामा**—मलाच नव्हे, तर वर्गांतल्या सर्व मुलांना मास्तरांचं करणं अगदीं योग्य वाटतं ! " नीटनेटकेपणानं व स्वच्छतेनं शाळेंत येत जा," असं मास्तरांनीं तुला दहा वेळां सांगितलं आहे ! पण तुझ्या हातून तें कधींच घडत नाहीं ! काल तूं अंथरुणावरून उठून तसाच शाळेंत आलास ! तोंडसुद्धां धुतलं नाहींस ! डोक्यांतली टोपी वांकडी तिकडी, शेंडीच्या झिपऱ्या बाहेर आलेल्या, कोटाच्या गुंड्या तुटलेल्या आणि आंगांतला सदरा तर विचारायलाच नको—अगदींच घामट व कळकट ! तुझ्या दप्तरांतल्या लेखण्या व पुस्तकं हीं जणूं काय आमच्याकडे डोकवूनच पाहात होतीं ! तुझा गलिच्छपणा सुधारण्यासाठीं मास्तरांनीं आपल्या दांतांच्या कण्या केल्या असतील ! पण तुझं आपलं येरे माझ्या

मागल्या ! तुझी आई तुझ्याच बाजूनं बोलत होती म्हणतोस, पण तूं मुळीं तिला खरा प्रकार सांगितलाच नसशील !

**सदू**—खरंच, माझ्या हातून चुकी झाली, हें मी कबूल करतों.

**रामा**—नुसती कबूल करून काय करायचं आहे ! मास्तरांच्या सांगण्याप्रमाणें वागलं पाहिजे ! हें पहा, आपल्या आंगीं कितीही चांगले गुण असले, तरी प्रथम स्वच्छता व टापटीप हीं पाहूनच लोक आपणांला चाहूं लागतात ! हे दोन गुण नसले, तर कोणी कुत्रासुद्धां जवळ येऊं देणार नाहीं !

**सदू**—बरं तर ! आजपासून असला गैदीपणा मी अगदीं सोडून देतों ! तूं मला उपदेश केलास व माझी चुकी मला समजावून सांगितलीस, ह्याबद्दल मी तुझे आभार मानतों; व मास्तरांजवळही झालेल्या चुकीबद्दल क्षमा मागतों.

क्रमिक दुसरें पुस्तक. ( थोडा फरक करून )

---

# खरा भाऊ कोण ?

**नानू**—हें रे काय विनू ! हा माझा आंबा आहे. मी नाहीं तो तुला घेऊं देणार. तूं आपल्या वांटणीचा आंबा खाऊन आतां माझा खायला पाहतोस काय ?

**विनू**—तुझा कोठला ? तो माझाच आहे !

**नानू**—होय तर ! आईनं तुला दोन आंबे दिले होते वाटतं ! विचारूं का आईला ?

**विनू**—तिला कशाला विचारायला पाहिजे ? मी सांगतों ना ! हा माझा आंबा आहे, व तो मी घेणार !

**नानू**—घेणार ? कसा घेतोस पाहूं ?

**विनू**—हा पहा घेतला !

( दोघांची झोंबाझोंबी होते. विनू नानूला मारतो आहे व नानू ओरडत आहे इतक्यांत सदाशिवराव नांवाचे एक अपरिचित गृहस्थ येतात. )

**सदा०**—अरे, असे भांडतां काय ? ( नानूकडे बोट करून विनूला विचारतात ) हा तुझा कोण ?

**विनू**—माझा भाऊ.

**सदा०**—छे ! भाऊ नाहीं दिसत.

**विनू**—नाहीं कसा ? माझा भाऊच आहे. सारा गांव सांगेल; तुम्ही काय नाहीं म्हणतां ?

**सदा०**—छे रे ! हा जर तुझा भाऊ असता, तर तूं याला असं मारलं असतंस काय ? खरं सांग.

**विनू**—तो मला आंबा घेऊं देत नव्हता, म्हणून मीं त्याला मारलं.

**सदा०**—एकूण ह्या मुलापेक्षां तुला आंबा अधिक आवडतो, हें खरं ना ? आतां तूंच पाहा व कोणालाही विचार कीं, माणसाला आंबा अधिक वाटतो का भाऊ ? मला तर तुझ्या ह्या वर्तनावरून असं दिसतं कीं, हा आंबा तुझा भाऊ आहे; हा मुलगा कांहीं तुझा भाऊ नव्हे. हा कोणी तरी परका मुलगा आहे.

**विनू**—खरंच चुकलों ! आपण माझी चुकी मला समजावून दिली, याबद्दल मी आपले आभार मानतों व ह्यापुढं मी आपल्या भावाशीं प्रेमळपणानं वागण्याची शपथ घेतों.

**सदा०**—शाबास बाळ ! तुझं कल्याण असो.

[ **आनंद मासिक.** ]

---

# परीक्षेचा निकाल.

**काका**–मन्या शकू तुम्हि प्रगतिपुस्तकें आणा गुरुंनीं जीं दिधलीं ।
परीक्षेंत किति पाहुं तयारी दोघांनीं तुम्हि दाखविली ॥ १ ॥
मन्या, असा तूं ठोंब्या कैसा झालासी तरि मठ्ठ भला ।
दांत काढुनी हंससी कांहीं लाज न कशि वाटत तुजला ॥ २ ॥
पहा मिळाले शंभरांतले पांच मार्क तुज गणितांत ।
इतिहासामधिं दिवा लाविला मार्क मिळवुनी हे सात ॥ ३ ॥
शकू सोनुले धन्य तुझी गे मार्क मिळाले छान तुला ।
वर्तणुकीचा शेरा उत्तम नंबरही पहिला आला ॥ ४ ॥
या ठोंब्याला मास्तर वरच्या वर्गामध्यें ना घेती ।
शकू परि तुला छानदारशी बाहुलि बक्षिस ते देती ॥ ५ ॥
ठोंब्या, तुजला योग्य वाटतें बक्षिस धम्मक लाडु वडा ।
शकुंतले, घे तुजला बाळे देतों सातारी पेढा ॥ ६ ॥

**मन्या**--( आपल्याशीं ) [ काका जातात.

नखाएवढी शकू परि तिला काकांनीं पेढा दिधला ।
परि हा पठ्ठया उपटिल तोही योजुनि कांहीं युक्तीला ॥ ७ ॥

**शकू**--दादा दादा ये खेळाया लग्न बाहुलीचें लावूं ।
खेळ संपतां अर्धा अर्धा पेढा वांटुनि मग घेऊं ॥ ८ ॥

**मन्या**—( आपल्याशीं )

सहजासहजीं अर्धा पेढा खाया तर मज मिळणार ।
परि युक्तीनें शकुपासुनि मी सगळा पेढा घेणार ॥ ९ ॥

( उघड )

शकू सोनुले किती शाहणी म्हणुनी वाखाणिति काका ।
भातुकलीचा मूर्ख मुलींचा खेळ असा हा खेळसि कां ॥ १० ॥

शाळा शाळा खेळ खेळुं हा होतों मी मास्तर खासा ।
देतों तुजला या पेढयावरि वस्तुपाठ गे उत्तमसा ॥ ११ ॥
दूध अटवुनी करिती मात्रा त्यासि खवा ऐसें वदती ।
खव्यामधीं मग साखर मिसळुनि पेढे उत्तमसे वळती ॥ १२ ॥
गोड बहु खायाला लागति बुद्धि वाढते पेढयांनीं ।
म्हणुनी खावे शकुंतले हे पेढे मजसम मह्वांनीं ॥ १३ ॥
[ पेढा खातो. ]
रडूं नको गे माझी ताई हुषार आतां होईन ।
पुढच्या वर्षीं पास होउनी वरच्या वर्गीं जाईन ॥ १४ ॥
**शकू**--दादा, तूं किति लबाड असशी थांब सांगतें काकाला ।
काका काका बघा बघा हो दादानें पेढा खाल्ला ॥ १५ ॥
**काका**-- ( काका येतात. )
महामूर्ख तूं खोडसाळ किति फसविलेंस का बहिणीला ।
आज खरा निर्लज्जपणाचा तुझ्या किं रे कळसचि झाला ॥ १६ ॥
अभ्यासामधिं तशी फजीती वरती आणखि या खोडया ।
कडक शासनाविणें न जातिल संवयी ह्या साऱ्या वेडया ॥ १७ ॥
शिक्षकास मी तुझ्या लिहीतों खरपुस मार तुला द्याया ।
शकू, चल तुला देतों पुष्कळ उत्तमसा खाऊ खाया ॥ १८ ॥
**मन्या**-आतां पश्चात्ताप होतसे एक वेळ मज क्षमा करा ।
करीन न कधीं खोडया किंवा कंटाळा अभ्यासिं जरा ॥ १९ ॥
**काका**-एकवार तुज क्षमा करितसें दुर्गुण झणिं टाकुनि देईं ।
लहानग्या बहिणीचा कित्ता उत्साहें गिरवित जाईं ॥ २० ॥

# मोडी जाणणारा पारशी ऑफीसर.

**ऑफीसर**--( खुर्चीवरून मोठया ऐटीनें ) सिपॉय, सिपॉय, ए सिपॉय, गन्नो, ए गन्नो, ए गद्धा गन्नो ( शिपाई येतो ) ए गध्धा, तमे सगळा लोक असा काय करते ? मे तो अर्धा कल्लाक बोम् मारते !

**शिपाई**--मसनी मोटया कलार्कांनीं बुलावलं, तकड गेलों होतों साब !

**ऑफीसर**--मेतो तुला हज्जार वखत शांगितला कीं, ए जाग्यावरून नाय् जायला पायजे. ते तूं ऐकतो नाय ! मे तो तुला फरिथी शांगते, "जो तू मने दूशरे वखत मळसे, तो मेतो तुला डिस्मिस् करेल ! कद्दी नाय छोडेल !" समजे ? के समजा नथी ? बुलाव मिस्टर तिरमक हरी. ( शिपाई जातो व त्रिंबक हरी येतो ) कम् ऑन् मि. तिर्मक हरी. मि. तिर्मक हरी, तमे तो आमच्या हापीसमंदे मोटा फर्स्टक्लास रायटर हाय. पन तमे सगला कागद मोरीमंदे कसाला लिवते ?

**कारकून**--( हात जोडून ) नाहीं साहेब ! मी हे कागद हपिसांत बसून लिहिले ! मोरींत बसून नाहीं लिहिले साहेब !

**ऑफीसर**---एम् नाय शमजो ! मोरीमंदे कसाला लिवते ? बाळ बदीमंदे लिवेल तोवी काय नाय ! गुजरातीमंदे लिवेल, तो बी काय नाय ! अंग्रेजीमंदे लिवेल, तो बी काय नाय ! पन तमे सगला कागद मोरीमंदे कसाला लिवते ?

**कारकून**--जी साहेब ! मला काय ठाऊक साहेबांना मोडी येत नाहीं तें ?

**ऑफीसर**:—अरे एम् नाय समजो, के मने मोरी आवरते तो नथी ! मने वध्धू आवरे छे ! आमचा तो पेस्तनकाका लोनावलामा हता, ते वक्ते एका टीचरजवल मेतो तुमचा मोरी सगला सीकला हाय ! तुमच्या

स्कूलमंदे चालते ते, मोरीचा फर्स्ट रीडर, सेकंड् रीडर, थर्ड रीडर, मे तो सगला वाचला हाय. मने ते वध्धू आवरे छे. पन ते तुमचा मोरी हँडरायटिंग हाय की नाय ते मोटा खराब. मने तो एक अक्षरवी फुटते नाय! तेचेमंदी छुट्टा छुट्टा नाय लिवते! तुमचेमंदी जो आम् आम् आम् (हातानें भराभर लिहिण्याचा हावभाव करून ) गुछली करते, तेन् मोटा फर्स्टक्लास रायटर गणाते!

**कारकून**—नाहीं साहेब! मी सुटें सुटें लिहिलें आहे.

( कागद देतो. )

**ऑफीसर**—हां! मे तो वाचते! ज्या बोलांत नाचत माशे चालले होते ... मि. तिर्मक हरी, ये क्या लिवते? नाचत माशा कशा चालला होता? माशा तो पाण्यामंदी राहते!

**कारकून**—नाहीं साहेब! ते दोन शब्द सुटे आहेत. नाच आणि तमाशे.

**ऑफीसर**—एम्? त्या बोलांतून जायाची वाट हाय! मि. तिर्मक हरी; बोलांतून ते सूं?

**कारकून**—बोळ म्हणजे दोन भिंतींच्या मधली जागा.

**ऑफीसर**—( त्रासून ) अरे बोल तो मने खबर छे!

**कारकून**—साहेब, आंतून म्हणजे त्याच्या मधून.

**ऑफीसर**—अरे आतून ए पण मने खबर छे! पन बोलांतून ते सूं?

**कारकून**—साहेब, हा एक शब्द आहे; याचा अर्थ बोळाच्या मधून.

**ऑफीसर**—( शांत होऊन ) एक सब्द हाय! ए मने मालूम पडते नाय. माजे मनांत येचा अर्थ काय दूशराच पडते! मि. तिर्मक हरी, तमे एचा कापी जरा दूशरी करो. पन ते बध्धा वाळबदींमंदे करो. मने मोरी आवरे छे, पन तमोने दरवक्ते सताऊ पड छे. अच्छा, मे तो जरा फीरायला जाते!

ग. रा. नरसिंगपूरकर.

## उद्यमस्फूर्तिपर पद.

चला हो ! उठा ! झाडुं या आळसाला ।
कामधामीं सदा लांवुं मतिला ॥ ध्रु० ॥
येइ जो सुदिन तो साधुं या झडकरी ।
इष्टफलसिद्धि होवो न होवो ! ॥
एकचित्तें करूं यत्न वा निश्चयें, ।
सौख्य वा दुःख वा कांहिं येवो, ॥ चला हो उठा ! ॥१॥
प्रगतिपर पाउला टाकुनी हळुहळू ।
कांहिंना कांहिं तरि साधुं, या, या, ।
स्थिरमती होउनी सुश्रमा करुनियां ।
तत्फलाकारणें धीर धरूं या! ॥ चला हो उठा ॥ २ ॥

( कवि रेंदाळकर. )

## गवयाचा धंदा.

**पांडू**—काय चिंतू, आतां तूंच गात होतास वाटतं !

**चिंतू**—होय पांडू, कां बरं ?

**पांडू**—फारच चांगला गात होतास ! मला वाटलं, चांगला गवईच गात आहे. अभ्यासांत नाहीं तर गाण्यांत तरी तुझा नंबर खात्रीनं पहिला येईल चिंतू ! !

**चिंतू**—आमचे बाबासुद्धां नेहमीं असंच म्हणतात. माझी गाण्यांतली तयारी पाहून त्यांनीं मला शिकवायला एक गायनमास्तरही ठेविले आहेत.

**पांडू**—तरीच तुझी इतकी तयारी झाली आहे म्हणायची ! अशीच तुझी तयारी होत गेली, तर तूं एक चांगलाच गवई होशील.

**चिंतू**—आणि तसं झालं तर मोठेपणीं काय उद्योग करावा, याची तरी काळजी राहणार नाहीं.

**पांडू**—पण चिंतू, तुझे गायनमास्तर तुला नीट शिकवितात ना ?

**चिंतू**—हो हो ! आमचे मास्तर मला किती तरी मन लावून शिकवितात. सहाच महिने झाले, त्यांनीं मला किती तरी राग आणि गोड गोड गाणीं शिकविलीं आहेत.

**पांडू**—चिंतू, अरे नुसतीं गोड गोड गाणीं गातां आलीं म्हणजे झालं, असं समजूं नकोस. नामांकित गवयाला या धंद्यांतल्या पुष्कळशा खुब्या माहीत असाव्या लागतात; त्या शिकविल्या आहेत का त्यांनीं तुला ?

**चिंतू**—त्या कोणत्या बुवा ?

**पांडू**—सांगतों ऐक. प्रथम हें ध्यानांत धर कीं, कोठेंही आपलं गाणं व्हायचं असलं म्हणजे ठरलेल्या वेळेपेक्षां नेहमीं उशीरां जावं. लोकांना तिष्ठत ठेवणं हें एक मोठेपणाचंच लक्षण आहे.

**चिंतू**—खरंच. सभाबिभांतूनसुद्धां मोठीमोठी मंडळी नेहमीं उशीरांच येतात.

**पांडू**—त्याचप्रमाणं गाण्याला सुरवात करतांना विण्याचा किंवा पेटीचा सूर ठरविण्यांत बराच वेळ घालवावा; म्हणजे आपलं ज्ञान फार मोठं आहे, असं ऐकणारांस वाटेल.

**चिंतू**—होय पांडू. मोठमोठ्या गवयांची अशीच रीत दिसते खरी.

**पांडू**—तसंच ज्याला चांगला गवई म्हणवून घ्यावयाचं असेल, त्यानं प्रथम कर्कश आवाजांत गायला शिकलं पाहिजे; आवाज कर्कश नसला, तर रेकून म्हणण्याचा तरी अभ्यास केला पाहिजे. आणखी हें बघ चिंतू, गातांना नेहमीं शक्य तितकं तोंड वेडंविद्रं करावं. अंधारांत

ज्याप्रमाणं दिव्याचं तेज चमकतं, त्याप्रमाणं वाकड्या तोंडांतून निघणारं गाणं, लोकांना सहजच गोड वाटतं.

चिंतू--पांडू, तूं मोठा चतुर दिसतोस खरा.

पांडू--आणखी, चांगला गवई म्हणवून घेण्याची इच्छा बाळगणारानं नेहमीं आपली आपणच वाहवा करण्यास शिकलं पाहिजे, आणि तसं करतांना इतर गवयांस नांवं ठेवीत जाणं हें अधिक चांगलं !

चिंतू--खरं रे खरं. अरे ह्या जगांत आपली आपण वाहवा केल्याशिवाय कधींच कोणाची चलती होणार नाहीं.

पांडू--त्याचप्रमाणं आपल्याबरोबर पेटी व तबला वाजविणारीं माणसं असतात, त्यांना नेहमीं चकविण्याचा प्रयत्न करावा; म्हणजे ऐकणारावर गाणाराची चांगलीच छाप पडते.

चिंतू--कां नाहीं पडणार ? त्या विचाऱ्यांची फजिती झाली, म्हणजे गाणाराची सहजच तारीफ होणार. त्यांतून गाणं जर लोकांना आवडलं नाहीं, तर त्याचं खापर पेटी-तबला वाजवणारांवर आपोआपच फोडतां येईल.

पांडू--शाबास ! कशी पण बरोबर खुबी ओळखलीस ! आणखी हें बघ, गवयानं इतरांशीं नेहमीं बेपर्वाईनं वागावं. कोणी कल्याण राग सुचविला, तर भैरवाला सुरवात करावी; श्लोक सांगितला कीं पद म्हणावं. गवईलोक लहरी असतात ही कीर्ति कायम ठेवण्यासाठीं प्रत्येक चांगल्या गवयानं नेहमीं झटलं पाहिजे.

चिंतू--किती तरी चांगल्या खुब्या पांडू तुला माहीत आहेत ! आमच्या गायनमास्तरांनीं यांपैकीं एक खुबी मला सांगितली असेल तर शपथ !

पांडू--अरे ते कसे सांगतील ? या पडल्या धंद्याच्या खुब्या ! या का ते तुला सांगणार ? पण तूं जर माझ्या घरीं येशील, तर मी तुला आणखी

देखील खुब्या सांगेन. अरे, सा, री, ग, म बरोबर जेव्हां तूं ही संथा घेशील तेव्हांच तुला गवयाचा धंदा कांहीं तरी करतां येईल.

चिंतू--असं दिसतं खरं पांडू. चल, असाच मी तुझ्या घरीं येतों; आणि साऱ्या खुब्यांचं तुझ्यापासून टांचणच करून घेतों. म्हणजे त्यांचा अभ्यास करण्यास बरं पडेल !!

सुदाम्याचे पोहे ( फेरफार करून. )

---

## आजारपणाची हौस.

पडूं आजारी । मौज हीच वाटे भारी । धृ० ॥

लागेल न जावें शाळेला ।
काम कुणी सांगेल न मजला ।
किंबहुना होतिल, सेवेला ।
तत्पर सारीं ॥ मौज ॥ १ ॥

मिळेल सांजा, साबूदाणा ।
खडिसाखर, मनुका, बेदाणा ।
संत्रीं साखरलिंबू आणा ।
जा बाजारीं ॥ मौज० ॥ २ ॥

भंवतीं भावंडांचा मेळा ।
दंगा थोडा जरि कुणि केला ।
मी कावुनि सांगेन तयाला ।
जा बाहेरी ॥ मौज० ॥ ३ ॥

आज्ञा जन मानितील माझी ।
झटातिल ठेवाया मज राजी ।
बसेल गोष्टी सांगत आजी ।
मज शेजारीं ॥ मौज० ॥ ४ ॥
असलें अजारीपण गोड ।
असुनी कण्हति कीं जन मूढ ।
हें मजला उकलेना गूढ ।
म्हणुनि विचारीं ॥ मौज ॥ ५ ॥

फर्ग्यूसन कॉलेज मॅगझिन.

---

## दुर्योधन आणि शल्य यांचा संवाद.

**दुर्योधन**—मद्रपते शल्या, मी तुला एक विनंति करूं इच्छीत आहें.

**शल्य**—सार्वभौम दुर्योधन महाराज, मी आपला एक मांडलिक आहें. आपले हुकूम बजावण्याची माझी योग्यता; तेव्हां माझ्या योग्यतेला शोभेल, असं कोणतंही काम मला सांगण्याचा आपला अधिकारच आहे.

**दुर्योधन**—हें पहा, भीष्मद्रोणासारखे अतिरथी—महारथी हरपल्यामुळं रिकाम्या झालेल्या सेनापतिपदावर मीं कर्णाची योजना केली आहे, तें तुला ठाऊकच आहे.

**शल्य**—अर्जुनासारख्या कसलेल्या व पटाईत वीराशीं सामना देण्यास कर्णाची योजना आपण केली, हें योग्यच झालं.

**दुर्योधन**—म्हणून म्हणतों कीं, तूं आतां कर्णाचा सारथी होऊन त्याला मदत करावी.

**शल्य**--( रागानें ) काय ? मी कर्णाचा सारथी होऊं ? सारथी-पुत्राचा सारथी होऊं ? आमच्या रथाचे घोडे हांकतांना ज्याच्या बापाचा जन्म गेला, त्याचा सारथी होऊं ? त्याच्या रथाचे घोडे हांकण्याचं काम मी पत्करूं ? ज्यानं आम्हां राजे लोकांचीं स्तुतिस्तोत्रं गाऊन किंवा आमचं दास्य पत्करून आपलं पोट भरावं, अशा त्या कर्णाचा मी सारथी होऊं ? छे छे छे ! महाराज, यांत माझा अपमान आहे, व अपमानापेक्षां मरण बरं, हें आपण जाणतच आहां. महाराज, आम्हां मांडलिक राजांना सेनापतिपद देण्याचं सोडून ज्यानं दहा वेळां रणांगणांतून पळ काढला, त्या पळपुट्या कर्णाला सेनापतिपद देण्यांत आपल्याकडून थोडा अविचार झाला आणि अशा माणसाची हीन सेवा करण्यास एका मांडलिक राजाला आपण सांगतां, हा त्या अविचारावर कळस झाला ! महाराज, आम्ही कांहीं नामर्द नाहीं ! हा मान जर आमच्या वांटयास येता, तर आम्हीं सुद्धां शत्रूचा नाश केला असता किंवा मरून तरी गेलों असतों. विनाश-काल जवळ आला, म्हणजे विपरीत बुद्धि होते, हेंच खरं. आतां येथें अशा स्थितींत राहण्यापेक्षां मला आपल्या राजधानींत जाण्याला आपण परवानगी द्यावी. आमचा सारथी होण्याइतकीच ज्याची योग्यता त्या कर्णाचा मी सारथी होणं, ही गोष्ट मुळीं शक्यच नाहीं !

**दुर्योधन**--शल्या, तुझी योग्यता फार मोठी आहे, हें मी जाणतों; आणि म्हणूनच मी तुला नेहमीं हुकूम न करतां विनंति करतों व बरोबरीच्या नात्यानं तुझ्याशीं मित्राप्रमाणें वागतों. ह्या भारतीय युद्धांत सेनापति कर्णाचं जर तूं सारथ्य करशील, तरच आम्हांला जयाची आशा आहे. तुझा अपमान करावा किंवा तुला कमी लेखावं, म्हणून हें सारथीपणाचं काम मी सांगत आहें, असं तूं समजूं नकोस. कठीण प्रसंग येतांच ब्रह्मदेवानं सुद्धां शंकराचं सारथ्य केलं व श्रीकृष्ण हा अर्जुनाचं

सारथ्य करीत असलेला तूं पाहातच आहेस. सारथ्यकर्मांत कृष्णाची बरोबरी करण्यास तुझ्यावांचून दुसरा कोणी नाहीं. आजपर्यंत सारथी निवडण्यांत चूक झाली व त्यामुळंच मोठमोठे सेनापति आम्ही गमावून बसलों ! आतां तूंच आमचा श्रीकृष्ण आहेस, तेव्हां मी तुला हात जोडून विनंति करतों कीं, " तूं कर्णाचं सारथ्य कर. "

**शल्य**--सम्राट दुर्योधन महाराजांच्या विनंतीचा अव्हेर आतां माझ्याकडून होणार नाहीं. मी त्या कर्णाचं सारथ्य करीन, पण माझी एक अट आहे.

**दुर्योधन**--कोणती अट आहे ती सांग. तूं कर्णाचा सारथी होत असलास, म्हणजे तुझी कोणतीही अट मी कर्णाकडून मान्य करवीन.

**शल्य**--माझी अट एवढीच कीं, मी कर्णाला वारंवार टोंचून बोलेन व त्याचा पाणउतारा करीन; तो त्यानं सहन केला पाहिजे.

**दुर्योधन**--ठीक आहे. आलेल्या कठीण प्रसंगाकडे लक्ष देऊन कर्ण ही तुझी अट मान्य करील व मी त्याकडून शपथ घेववीन. आतां मात्र तूं त्याला मनःपूर्वक साह्य केलं पाहिजे.

**शल्य**--त्याबद्दल मुळीं शंकाच नको. माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी आपलं काम उत्तम प्रकारानं बजावीन. आतां आम्हीं दोघेजण जय मिळवूं किंवा मरून जाऊं; पळून जाणार नाहीं आणि पांडवांच्या सैन्याचा भयंकर संहार केल्यावांचून राहाणार नाहीं, अशी आपण खात्री बाळगावी.

**दुर्योधन**--ठीक आहे. चल तर ह्याच पावलीं आपण कर्णाकडे जाऊं.

# मनुष्यस्वभावाचा एक मासला.

**राव०**—(दाराशीं) राम्या, ए राम्या, कुठें रे लेका होतास ? दाराची कडी खडखडवितां हात दमले, आणि हाका मारतां मारतां घसा कोरडा पडला. तुझे कान काय फुटले होते ?

**नोकर**—( दाराची कडी काढून ) धनीसाहेब, मी मागं परसांत झाडांना पाणी घालीत होतों. धनीसाहेबांची हांक ऐकतांच अक्षी धावून आलों बगा.

**राव०**—अस्सं काय ! तुला सारी एकच हाक ऐकूं आली एकूण ! थांब, तुझे कान उपटून चांगले लांब करतों, ह्मणजे तुला चांगलं ऐकायला येत जाईल. दाराला कडी घालायला कशाला हवी होती ? उघडं ठेविल असतस तर दिवसाढवळ्या चोर आले असते काय चोरी करायला ?

**राम्या**—काल दार उघडं राहिलं होतं तर धनीसाहेब तिकडून रागं भरले, म्हणून मी आज दाराला कडी लाविली. यांत माझी काय कसूर झाली ? दार लावलं तर धनीसाहेबांना राग येतो ! आतां करावं तरी कसं ?

**राव०**—करावं कसं ? सांगतों थांब.

**मित्र**—रावसाहेब, जरा शांत व्हा. त्याचं ह्मणणं—

**राव०**—( मध्येंच मित्राला थांबवून ) तुम्ही मध्यें बोलूं नका. ( राम्यास ) करावं कसं ? गद्धा ! उलटून जवाब देतोस ?

**मित्र**—जाऊंद्या हो रावसाहेब, या नोकरांचं—

**राव०**—अण्णासाहेब, तुम्ही आमच्या भानगडींत न पडावं हें चांगलं. या नोकरांना बसतां लाथ अन् उठतां बुक्कीच पाहिजे.

**मित्र**—(आपणाशीं) रावसाहेबांची मिजास जरा तऱ्हेवाईकच दिसते. खरं म्हटलं तर नोकराकडे चूक दिसत नाहीं.

**राव०**—काय राम्या ? कसं करावं तें तुला शिकवूंच का ? कर इकडे कान पाहूं ?

**राम्या**—राहिलं माझं बोलणं. यापुढें धनीसाहेबांची स्वारी बाहेर गेल्यावर दार लावायचं कीं उघडं ठेवायचं हें कळलं म्हणजे तसं करीत जाईन. बोला, दार उघडं टाकीत जाऊं ?

**राव०**—अन् तुझा काका घरांत शिरून चोरी करून पळाला तर तुझं काय जाणार आहे ?

**राम्या**—बरं तर. लावून घेत जाऊं ?

**राव०**—अन् मग तुझ्या नांवानं आह्मी शंख करावा हेंच कीं नाहीं ?

**राम्या**—मग आतां कसं करायचं ? दार लावूंही नकोस अन् उघडंही टाकूं नकोस. दोन्ही गोष्टी कशा करायच्या ?

**राव०**—खबरदार ! तूं नोकर माणूस ! अन् आपल्या धन्याची अशी बेअदबी करतोस ?

**मित्र**—रावसाहेब, माझं जरा ऐकून घ्याल काय ? याचं ह्मणणं वाजवी दिसतं. काय तो एक हुकूम द्या, त्याप्रमाणं तो चालेल.

**राम्या**—कसं बोललांत ?

**राव०**—पुनः तोंड करून बोलतोस ?

**राम्या**—ही नोकरी नाहीं, कर्माचा भोग आहे, दुसरं काय ? दुसऱ्याची चाकरी करणारांना अक्कल नसते असं म्हटलं पाहिजे.

**राव०**—हां! पुनः बजावून सांगतों. आपलं तोंड संभाळ, नाहीं तर माझ्याशीं गांठ आहे. समजलास ?

**राम्या**—हें पहा तोंड आवरलं. पण दार लावून घेत जाऊं कीं उघडं ठेवीत जाऊं हें एकदां कळलं ह्मणजे माझं काय ? तसं करीत जाईन.

**राव०**–तुला हज्जार वेळां सांगितलं तरी पुनः तुझं आपलं तेंच. चार रुपड्यांचा तूं नोकर ! अन् तोंडास तोंड देतोस ?

( मित्र हंसें दाबूं लागला असें पाहून )

**राव०**––( मित्रास ) अण्णासाहेब, हंसण्याची ही गोष्ट नव्हे, इज्जतीचा येथें प्रश्न आहे.

**अण्णा०**–रावसाहेब, नोकर येथून तेथून असेच बेअकली. सांगितल्यासारखं करतील असं कधीं व्हायचंच नाहीं.

**राव०**–पण अण्णासाहेब, हा असा बेअकली उर्मट नोकर तुम्हींच नाहीं का मला पाहून दिला ?

**अण्णा०**––हो, चूक झाली खरी.

**राव०**–याला अक्कल असती, अन् थोरामोठ्यांच्या घरीं कसं वागावं हें जर याला कळतं, तर हा असं चुरुचुरु बोलला असता का ?

**अण्णा०**—जाऊं द्या, त्याचं आतां काय ? मला तुम्हांला एक गोष्ट सांगायची आहे.

**राव०**–तुमच्या पसंतीचा हा गद्धा कसा उर्मट आहे येवढंच तुम्हांला मला दाखवावयाचं होतं. (राम्याला) जिन्यांतून झाडून काढलंस काय ?

**राम्या**–हो धनीसाव. थेट वरपासून खालपर्यंत झाडून काढलं.

**राव०**––अन् अंगण ?

**राम्या**––तें पण काढलं. कसं स्वच्छ केलं आहे तें पहावं.

**राव०**—घोड्याला पाणी पाजलं ?

**राम्या**––होय, धनीसाव.

**राव०**—अन् त्याला चंदी दिली ?

**राम्या**—बाईसाहेबांच्या देखतच दिली.

**राव०**––सोड्याच्या बाटल्या नसतील लालाजीच्या दुकानीं अजून पोंचविल्या ?

**राम्या**—त्या पोंचवून नव्याही आणिल्या.

**राव०**—अन् पत्रं पोष्टांत नेऊन टाकलीं कीं तीं तशींच अजून पडलीं आहेत ?

**राम्या**—केव्हांच पोष्टाच्या पेटींत नेऊन टाकलीं.

**राव०**—हो. बरी आठवण झाली. काय रे राम्या, तूं पहाटेस उठून भूपाळ्या कीं कायसें म्हणत बसत असतोस, त्यानं आमची झोपमोड होते, असं तुला बजाविलं असून तूं आज सकाळीं त्या कां म्हणत होतास ?

**राम्या**—आज सकाळीं ? मी काल रात्रीं जो मावशीच्या घरीं गेलों होतों तो आत्तां सात वाजतां आलों. मग पहाटेस भूपाळ्या कसा म्हणणार ?

**राव०**—( अण्णासाहेबास ) याला काढून द्यावं असं कित्ती वेळां तरी मनांत येतं. आजपर्यंत पुष्कळ नोकर आमच्या इथं झाले. पण याच्यासारखा उर्मट मनुष्य नव्हता कधीं पाहिला ! ( राम्याला ) बरं जा घरांत, अन् आपल्या कामाला लाग.

**अण्णा०**—( स्वतःशीं ) चूक कोणाची आणि बोलणीं खावीं लागतात कोणाला ? जगाचा न्याय असाच विचित्र आहे !

**आनंद—मासिक**

---

# देवांची सभा.

## ( अग्नि, वरुण, वायु व विद्युत. )

**वरुण**—बंधूभगिनिनों, हल्लीं मनुष्यवर्गाकडून आम्हां देवांचा पदोपदीं अपमान होत आहे, तो टाळण्यास काय उपाय योजावेत याचा विचार करण्यासाठीं आज ही सभा मुद्दाम बोलाविली आहे; आजच्या ह्या मह-

स्वाच्या प्रसंगीं मनुष्यमान्य व देवमान्य श्रीयुत चंद्रदेवराव यांनीं अध्यक्ष-स्थान स्वीकारावें अशी मी त्यांना विनंती करितों.

**अग्नि**—श्रीयुत वरुणराव यांनीं केलेल्या सूचनेला माझें पूर्ण अनुमोदन आहे.

**अध्यक्ष**—आपण आज मला हा जो बहुमान दिला, त्याबद्दल प्रथम मी आपणां सर्वांचे फार आभार मानतों. आतां जास्त वेळ न दवडतां कामास प्रारंभ होण्यासाठीं श्रीयुत वायुदेवराव भरारे यांनीं आपल्या भाषणास सुरवात करावी, अशी मी त्यांस विनंति करितों.

**वायुदेव**—स्वर्गबांधवहो, आज आपण येथें मृत्युलोकांत कां जमलों आहों, हें आपण सर्वजण जाणतच आहां. आज इतके दिवस आपण जो स्वातंत्र्याचा उपभोग घेतला, त्यावर ह्या निमकहराम मनुष्यजातीकडून गदा घालण्यांत येत आहे; आणि या वेळीं जर आपण स्वस्थ बसलों, तर त्या हक्काला आपण कायमचे मुकणार आहोंत. आजपर्यंत आपण ह्या सृष्टिदेवीचे स्वतंत्र मालक होतों; पण सर्वांच्या मागून आलेल्या या मनुष्यजातीनें आपणांस हळूहळू गुलाम बनविलें आहे. पूर्वी आपण कोणत्या वेळीं काय करणार याची खबर आपल्याशिवाय इतरांस कळत नसे. परंतु आतां अमक्यावेळीं अमुक ठिकाणीं वायूचा फेरफटका होणार आहे, अमुक दिवशीं अमुक वाजून अमुक मिनिटांनीं आपले अध्यक्ष महाराज चंद्रराव यांस ग्रहण लागणार आहे, वगैरे वगैरे गोष्टी हुषार व चाणाक्ष माणसें कित्येक वर्षं अगोदरच छापून प्रसिद्ध करूं लागलीं आहेत! आपल्या कोणत्याही कृत्यांत गुप्तपणा असा राहिलाच नाहीं, असें म्हटल्यास चालेल. श्रीमती विद्यादेवीला मृत्युलोकांत फिरण्याची मोकळीक दिल्यामुळेंच असा हा आपला अपमान होत आहे. तिनें स्वर्गलोक सोडून कोठेंही जातां कामा नये, असा जर बंदोबस्त झाला नाहीं, तर आपल्यावर ह्यापुढें काय काय अनर्थ ओढवतील तें सांगतां येत नाहीं! आपली मदत मिळविण्यासाठीं माणसें पूर्वींसारखी आपली

प्रार्थना करीत नाहींत, तर नौकराप्रमाणें हुकूम सोडितात! या माणसांना पूर्वीं समुद्रापार जातां येईना, म्हणून मी त्यांच्यावर दया करून त्यांचीं जहाजें लोटीत नेलीं; पण ही कृतघ्न माणसें माझे उपकार विसरून मला अधिकच हलक्या दर्जाचीं कामें सांगूं लागली! दळण, कांडण, पाणी भरणें, इत्यादि कामें रोजच्या रोज मजकडून करून घेत आहेत! मी कदाचित् नाहीं म्हणेन, ह्मणून मला कोंडून ठेवण्याची देखील त्यांनीं युक्ति काढली आहे! अशी माझी एकटयाचीच दुर्दशा उडाली आहे असें नाहीं, तर माझे मित्र श्रीयुत वरुण व अग्नि यांचीही अशीच हलाखीची स्थिति झालेली आहे. आपणां सर्वांना या गुलामगिरीचा थोडाबहुत अनुभव आहेच; तेव्हां ज्यानें आपणांस अमर केलें, अशा देवाधिदेव ईश्वराकडे आपण सर्वांनीं गाऱ्हाणें नेऊन दाद मागावी, अशी माझी सूचना आहे.

**अध्यक्ष**—श्रीयुत अग्निदेव जाळपोळे ह्यांनीं आपल्या भाषणास सुरवात करावी, अशी मी विनंति करितों.

**अग्निः**—माझे मित्र वायुदेवराव भरारे यांनीं सांगितलेली दुःखाची कहाणी सर्वांच्या इतकी अनुभवांतली आहे कीं, या सूचनेला सर्व देव एकमतानें अनुमोदन देतील, अशी माझी खात्री आहे. माझा स्वतःचा अनुभवही असाच आहे! सृष्टीच्या अगदीं आरंभीं मी अगदीं अज्ञातवासांत राहण्याचा विचार केला होता आणि त्याप्रमाणें कित्येक युगें गारगोटींत मी गुप्तपणें वास करून राहिलोंही होतों. पण एकदां एका माणसानें गारगोटीवर पोलादाचा तुकडा सहज आपटला, त्याबरोबर मी अचानक प्रगट झालों! तोच माझ्या दुर्दैवाचा प्रारंभ! त्यानंतर बरींच वर्षें ही मानव मंडळीं आपल्या साह्यासाठीं मला मोठ्या अदबीनें आणि सन्मानानें बोलावीत; त्यांच्यांतला ऋषिगण माझी मनापासून प्रार्थना करी आणि मी प्रगट झाल्यावर मला बळी अर्पण करी! पण मी जसजसा त्यांच्या स्तुतीला भुलून त्यांच्यावर दया करूं लागलों, तसतशी

ते माझी मानखंडना करूं लागले ! आणि माझ्याकडून सैपाक्याचें, हमालाचें फार काय पण बैलाचेंसुद्धां काम घेऊं लागले ! नाहीं म्हणण्याची मुळींच सोय नाहीं ! माझ्या संमतीची पर्वा वगैरे न करितां सक्तीनें मजकडून हवीं तीं कामें करून घेत आहेत ! मी त्यांच्या तावडींत पुरा सांपडल्यामुळें माझें कांहींच चालेनासे झालें आहे ! कधीं कधीं ते, त्यांचीं घरेंदारें, वगैरे हरएक वस्तु माझ्या तावडींत सांपडतात ! तेव्हां मात्र मला त्यांच्यावर पूर्णपणें सूड उगवायला सांपडतो ! परंतु असा प्रसंग फारच थोडा ! माझ्या गुलामगिरीचें एक बारकेंसें उदाहरण सांगून मी हें रडगाणें आतां पुरें करणार आहें. मला कोंडण्यासाठीं त्यांनीं एक छोटीशीं पेटी तयार केली असून तींत बारीक काड्यांच्या टोंकावर मी बसावें, आणि माझें आंग पेटीवरच्या खरबरींत जागेवर घासल्याबरोबर तो इषारा समजून मी त्यांच्या सेवेला गुलामाप्रमाणें वाटेल त्यावेळीं हजर व्हावें, अशी त्यांनीं माझी अगदीं निकृष्टावस्था करून सोडिली आहे. सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं, आतां हें गाऱ्हाणें सर्वांनीं एकजुटीनें परमेश्वराजवळ नेल्यावांचून तरणोपाय नाहीं, असें माझें निक्षून सांगणें आहे.

**अध्यक्षः**—माझ्या प्रिय भगिनी श्रीमती विद्युल्लताबाई चंचले यांनीं आपली तक्रार सभेपुढें निवेदन करावी, अशी मी त्यांस विनंति करितों.

**विद्युतः**—परमेश्वरानें माझ्या ठिकाणीं अफाट सामर्थ्य, दैदीप्यमान कांति, विलक्षण चपलता आणि गंभीर आवाज इत्यादि गोष्टींत परिपूर्णता दिलेली आहे; परंतु माझ्या गुलामगिरीची हृदयद्रावक काहाणी ऐकून दगडालासुद्धां पाझर फुटल्यावांचून राहाणार नाहीं ! हीं माणसें नाहीं नाहीं तीं कामें मला दररोज सांगत आहेत ! व इतरांप्रमाणें मीही यांच्या तावडींत पुरींच सांपडल्यामुळें त्यांचीं हलकींसलकीं कामें मला क्षणोक्षणीं करावीं लागत आहेत ! यांच्या निरोपांची ने आण करितांना

मराठी ग्रंथ संग्रहालय

मला क्षणभर देखील फुरसत मिळत नाहीं ! इतर कामांत थोडी विश्रांति तरी मिळते, पण ह्या कामांत रात्र असो, दिवस असो, सण असो, वार असो, एक सेकंदभर देखील स्वस्थ बसायला मिळत नाहीं ! मी ह्यांचीं सर्व कामें मुकाट्यानें आणि चोख बजावीत जातें, यामुळें तुमच्याकडून घेतलीं जाणारीं कामें देखील माझ्याकडून करून घेण्याचा त्यांचा विचार चाललेला आहे ! कांहीं दिवसांनीं ह्या माणसांच्या तडाक्यांतून तुमची थोडीबहुत सुटका होण्याचें चिन्ह मला दिसत आहे, परंतु तुमचीं कामें मात्र माझ्या बोकांडीस बसणार आहेत ! यासाठीं तुम्हीं मजबरोबर या अगर नका येऊं, मी आपली तक्रार घेऊन त्या दयाघन परमेश्वराकडे जाण्याचें नक्की ठरविलें आहे.

**अध्यक्ष**—मनुष्यप्राण्याविरुद्ध तक्रारींचा बराच खल होऊन सर्व देव-गण संतप्त झालेला दिसत आहे. आतां मी जे चार शब्द सांगणार, ते शांतमनानें ऐकून त्यांचा नीट विचार करावा अशी माझी आपणांस विनंति आहे. एकच वस्तु पण ती निरनिराळ्या दृष्टीनें पाहिली म्हणजे निरनिराळी दिसूं लागते. ज्या रंगाच्या चष्म्यांतून आपण त्या वस्तूकडे पाहूं, त्या रंगाची ती वस्तू दिसणार, हें उघड आहे. जिला आपण गुलाम-गिरी अशी संज्ञा दिली, तिलाच परोपकाराचें व्रत हें नांव देऊन त्या दृष्टीनें तिजकडे पाहा; म्हणजे तुमचा शीण नाहींसा होऊन उलट तुम्हांस उल्हासच वाटेल आणि स्वातंत्र्य नाहींसें झाल्याबद्दल खेद न होतां परो-पकार करण्याचे प्रसंग जास्त येऊं लागले, ह्याबद्दल आनंद होईल. आपण देवदेवता आहोंत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. क्षुद्रबुद्धीच्या माणसां-सारखे आपण मनोविकारांस वश झालों, तर आपलें देवपण कशांत राहिलें ? स्वतंत्रतेची किंमत मलाही कळते; पण तिच्याहून अधिक मौल्य-वान् व श्रेष्ठ अशी शक्ति परमेश्वरानें आपणांस दिली आहे, ती शक्ति

ह्मणजे दुसऱ्याच्या उपयोगी पडणें ही होय. ह्या कामांत कधींही खंड पडूं नये, म्हणूनच ईश्वरानें आपणांस अमर केलें आहे. त्याच्या इच्छेला अनुसरून आपण आपली शक्ति परोपकारांत खर्च करून आपल्या जन्माचें सार्थक केलें पाहिजे. दुसऱ्यानें आपली हांजी हांजी करावी आणि मग आपण त्याच्या उपयोगी पडावें, ही स्वार्थबुद्धि नव्हे काय? दुसऱ्यापासून गोड शब्दाची देखील अपेक्षा न धरतां आपण त्याच्या उपयोगी पडावें, यांतच खरें थोरपण आहे. हें थोरपणाचें उदाहरण मनुष्यजातीला घालून देण्यासाठीं परमेश्वरानें आपणांस जन्म दिला व आपल्या आंगीं निरनिराळी प्रचंड शक्ति ठेविली. तिरसटपणा, खुनसी-पणा वगैरे क्षुद्र मनोवृत्तींचा स्वीकार करून आपलें देवपण घालवूं नका. ईश्वरानें नेमून दिलेलें कार्य मुकाटयानें व बिननकार करणें याला गुलाम-गिरी समजूं नका. वस्तुस्थितीचा तुम्ही विपर्यास केला आहे, तो विचा-रानें काढून टाका. आणि कांहींएक ठराव पास न करतां मोकळ्या मनानें व आनंदानें आपापल्या कामास लागा एवढी माझी विनंति आहे.

**एक सभासद**—आज आपण क्रोधाला बळी पडून आपल्या देव-पणाला खचित मुकणार होतों. भलतेच ठराव पास करून ते त्या सच्चिदानंद परमेश्वराकडे आपण घेऊन गेलों असतों, तर आपल्या देव-पणाला अर्धचंद्र मिळाला असता यांत संशय नाहीं. आपले अध्यक्ष-महाराज श्रीयुत चंद्रराव शांतते यांनीं आपणां सर्वांचें देवपण आज कायम राखिलें, असें म्हटलें पाहिजे. आम्हांस वेळेवरच त्यांनीं शुद्धीवर आणिलें, याबद्दल मी सर्वांच्या वतीनें त्यांचे आभार मानतों.

[ आनंद १९१५.

---

# विचित्र हौस.

सकाळीं दहा वाजतां मी शाळेस जातों, तेव्हां एक फेरीवाला रोज मला आमच्या गल्लींत भेटतो. काचेच्या बांगडया हव्या काय ? असें तो मोठयानें ओरडून विचारीत असतो. तो वाटेल तिकडे फिरतो, आणि मनास येईल तेव्हां घरीं जातो. दहा वाजोत, साडे दहा वाजोत, त्याला घाई होत नाहीं. किंवा उशिराची तो पर्वा करीत नाहीं. मला वाटतें कीं आपणही स्लेट–पाटी फेंकून द्यावी, आणि त्याच्या सारखें फिरावें. शाईनें हाताचीं बोटें भरलेलीं अशी आमची स्वारी चार–वाजतां घरीं परत येते, तेव्हां एक माळी हातांत कुदळ घेऊन बागेंत माती उकरतांना दिसतो. ' कुदळ पायावर पाडून घेशील, किंवा ' काय हें अंग मातीनें भरविलें आहेस, असें कधीं कोणी त्याला म्हणत नाहीं. त्याला वाटेल तसें वागण्याची सदर परवानगी आहे.

रात्र होते न होते, तों निजण्यासाठीं आईचा लकडा आमच्या मागें लागतो. मी खिडकींतून पहातों तों एक पगडी घातलेला पहारेवाला रस्त्यांतून फिरत असतो. अंधार पडला, रस्त्यानें जाणारा येणारांची वर्दळ मोडली, म्युनिसीपालिटीचे कंदील मिणमिण जळूं लागले तरी हा आपला हातांत सोटा घेऊन दरवाज्यांत उभा तो उभाच ? रात्रीचे दहा वाजोत अकरा वाजोत, ' तूं अजून कां जागत बसला आहेस' असें त्याला कधीं कोणी म्हणत नाहीं.

मला वाटतें कीं, आपण पहारेवाला व्हावें, म्हणजे मनासारखें जागायला, आणि कंदीलाच्या उजेडानें सावलीच्या मागें जात जात सारी रात्र हिंडायला सांपडेल.

## (परीक्षेचें गाणें.)

परीक्षा आली,
छाती ती दडपुनि गेली ।।
परीक्षेचीं स्वप्नें पडतीं ।।
झोंपेमध्यें पेपर दिसती ।।
अभ्यासाचे ढीगचि पडती ।।
सुचेना कांहीं, सारखें द्विधा मन होई ।। १ ।।
आजवरी मी उगीच खेळलों ।।
फार उशीरा जागा झालों ।।
हर हर ! आतां फशींच पडलों ।।
झोंप येईना, विचार येती नाना ।। २ ।।
छातीवरचा दगड उतरला ।।
काळजिचा तो चूरचि झाला ।।
सव पुस्तकें केलीं गोळा ।।
परीक्षा झाली, ब्याद ती वर्षभर टळली ।। ३ ।।

---

## शिखासंरक्षक मण्डळ.

सभ्य गृहस्थहो, आपल्या मंडळाचे कायमचे अध्यक्ष लोकमान्य नरपुंगव चिंतामणी ह्यांनीं आजच्या प्रसंगीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी माझी नम्र सूचना आहे. ह्यांच्यासारख्या ऐश्वर्यसंपन्न गृहस्थांची स्तुति करण्याचा प्रसंग पूर्वपुण्याईनेंच येतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. जेव्हां जेव्हां आपल्या लोकांवर व आपल्या धर्मावर एकादें महासंकट येऊन पडतें, तेव्हां तेव्हां हे आपल्या रक्षणासाठीं उडी घालून

येतात. आज आपल्या सनातन धर्मावर फारच मोठें अरिष्ट येऊन कोसळलें आहे; जर आपली शेंडी नाहींशी झाली, तर आपल्या सनातन धर्माचा कधींही टिकाव लागणार नाहीं. शेंडीच्या आश्रयानेंच आपला हा धर्म आजपर्यंत जीव धरून राहिला आहे. शेंडीचें रक्षण करण्यासाठींच ह्या आपल्या अध्यक्षांचा अवतार आहे, हें मीं सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. भगवान् श्रीकृष्णांनीं म्हटलेंच आहे कीं, " यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवाति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ " ह्या भगवंताच्या आश्वासनाप्रमाणें शेंडीचें रक्षण करण्यासाठीं ज्यांनीं अवतार घेतला आहे व आपलें अवतारकृत्य तडीस नेण्यासाठीं ज्यांनीं ही संस्था स्थापन केली आहे, त्यांची अध्यक्षस्थानीं आज नेमणूक व्हावी, अशी माझी नम्र सूचना आहे.

**अध्यक्ष**—सद्गृहस्थहो, आज जो आपण मला बहुमान दिला आहे त्याबद्दल मी आपले अंतःकरणापासून फार फार आभार मानतों. माझ्या मित्रानें माझ्या केलेल्या स्तुतीस मी जरी पात्र नाहीं. तथापि धर्मरक्षणाचें कार्य मला नेहमींच प्रिय असतें. आज आपण एका मोठ्या धर्मकार्यासाठींच एथें जमलों आहोंत, हें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं.

इंग्रजी शिक्षणाचा प्रसार ह्या प्रांतांत झाल्यापासून आपल्या शेंडीवर मोठें अरिष्ट आलें आहे. हें अरिष्ट नवीन असल्यामुळें ह्याचा प्रतिकार करण्यास नवीन पाश्चात्य पद्धतींचेंच आपणांस अवलंबन केलें पाहिजे. म्हणजे, ह्यासाठीं एक सभा स्थापून अध्यक्ष, चिटणीस व इतर कार्यकारी मंडळींची योजना करून आपणांस ह्या महत्कार्यास आरंभ केला पाहिजे. हा काळ चळवळीचा असल्यामुळें शेंडीचें रक्षण करण्यासाठीं आपणांस मोठी चळवळ केली पाहिजे. ह्या स्तुत्य कामासाठीं हिंदुस्तानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत चळवळ करण्याची माझी तयारी आहे. ज्याला शेंडी आहे तो हिंदू, ही हिंदुत्वाची व्याख्या

REFBK-0003698 

आपण एकलों असेलच. आज शेंडी जर नष्ट झाली, तर आपलें हिंदुत्व नष्ट होईल व आपल्या धर्मकृत्यांचाही लोप होऊन जाईल. शेंडी हा शब्द आपल्या परमपूज्य महाराष्ट्र भाषेंतच आहे. युरोपांतील कोणत्याही भाषेंत तद्वाचक शब्द नाहीं, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आपली शेंडीच जर आज नष्ट झाली, तर कांहीं वर्षांनीं हा शब्द देखील आपल्या भाषेंतून नष्ट होईल. ह्यासाठीं मद्देशबांधवहो, आपल्या मायभूमीसाठीं मायधर्मासाठीं व मायभाषेसाठीं उठा, जागे व्हा व शेंडीचे रक्षण करण्यास्तव कंबर बांधा. पूर्वीं पृथ्वी गाईचें रूप धारण करून ब्रह्मदेवाजवळ करुणा भाकूं लागली, त्याप्रमाणें आज स्वसंरक्षणासाठीं शेंडी आपणांस करुणवाणीनें विनवीत आहे. ( येथें अध्यक्षांनीं पागोटें काढून आपली लांब शेंडी श्रोतृवृंदासमोर धरली ). हिचें रक्षण करा, हिला जिवदान द्या व संकटांपासून हिचा उद्धार करा, एवढेंच सर्वांपाशीं मागणें आहे.

**श्रीयुत वसंतराव दिवाकर**—प्रिय बांधवहो, आपल्या सन्मान्य अध्यक्षांनीं एकाद्या भयानक नागाप्रमाणें काळ्याभोर व लांबलचक शेंडीचें आपणांपुढें प्रदर्शन केलें, तसें मला करतां येत नाहीं ह्याबद्दल मी फार दिलगीर आहें. ( आपला फेटा काढून ) मी कबूल करतों कीं, तुम्हांला दाखविण्यास मजपाशीं शेंडी नाहीं. माझ्या डोकीवर केंस आहेत, ही गोष्ट लज्जास्पद असली, तरी त्या लज्जेचा अधिकारी मी नाहीं, ह्याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. मी पूर्वींपासूनच शेंडीचा मोठा अभिमानी आहें कॉलेजांतील डिबेटिंग क्लबांत ह्या विषयावर मी मोठमोठीं जोरदार व मुद्देसूद भाषणें केलीं आहेत. माझीं तीं भाषणें ऐकून आपल्या प्रतिस्पर्ध्यांची मोठी तारांबळ उडालेली आहे ! एकाद्या तपस्व्याचें उग्र तप पाहून इंद्रादि देवांस चिंता पडावी, त्याप्रमाणें माझ्या भाषणांनीं सगळा सुधारकसमूह चिंतामग्न झाला होता ! माझ्या व्रताचा भंग करण्यासाठीं

त्यांनीं जंग जंग पछाडले ! पण त्यांचा कांहीं एक उपाय चाललेला नाहीं ! शेवटीं एकानें मी गोष्टींच्या नादांत गुंग झालों असतांना आपली कात्री माझ्या शेंडीवर चालविली ! झालें ! ज्या शेंडीची सुमारें वीस वर्षेंपर्यंत मी मोठ्या काळजीनें जोपासना केली, तिचा माझा कायमचा वियोग एका निमिषार्धांत झाला ! कोणत्याही गोष्टीची वाढ होण्यास अनेक वर्षें लागतात, परंतु तिचा नाश होण्यास एक क्षणदेखील लागत नाहीं ! ह्यावरून एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, ज्यांच्या ज्यांच्या शेंड्या कायम असतील, त्यांनीं आपापल्या शेंड्यांचें रक्षण करण्यास डोळ्यांत तेल घालून झटलें पाहिजे. एकदां का शेंडीचा नाश झाला, तर तिची पुन्हां वाढ होण्यास अनेक वर्षें लागतील. ह्यासाठीं सर्वांनीं आपापल्या शेंडीचें रक्षण करावें, ती दुसऱ्याच्या हातीं जाऊं देऊं नये, हीच माझी सर्वांना सविनय प्रार्थना आहे. ( बसतात. )

**श्रीयुत मनोहरपंत**–विषयाचं साधारण स्वरूप आतांपर्यंत आपणांपुढें ठेवण्यांत आलेंच आहे. आतां शेंडीचें रक्षण करण्यास कोणते उपाय अमलांत आणावे, ह्याचा आपणांस विचार केला पाहिजे. ह्यासंबंधानें मी अनेक विद्वानांबरोबर पत्रव्यवहार केलेला आहे, पुष्कळांकडून अभिप्राय मागविले आहेत व अनेकांजवळ संभाषणें केलीं आहेत. मला जे उपाय सुचतात, ते मी आपणांपुढें आज मांडीत आहें. सध्यां कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद घेतात, ही फार चांगली गोष्ट आहे. अशा सभासदांकडून शेंडीचें रक्षण करणारें एकादें बिल कौन्सिलपुढें आणण्यास हरकत नाहीं. सरकार परकीय असल्यामुळें शेंडीस राजाश्रय मिळणें कठीण वाटेल, परंतु एकाद्या लोकमान्य नामदारांकडून असें बिल कौन्सिलपुढें आणावें. शेंडी नसलेल्या कोणत्याही हिंदू विद्यार्थ्यांस विश्वविद्यालयाच्या परीक्षेस बसण्याची मनाई करण्यांत यावी. कोणत्याही हिंदू शिखानष्टाला सरकारी नौकरी देऊं नये व दरवर्षी सर्वांच्या शेंडीची पाहाणी करण्यांत

*

यावी, इतकेंच नव्हे, तर शेंडी नसलेल्या माणसावर कर बसविण्यांत यावा. शेंड्यांचें प्रदर्शन भरवून ज्याची शेंडी सर्वांत मोठी व काळीभोर असेल, त्याला बक्षीस देण्यांत यावें. 'शेंडी असण्यापासून फायदे' ह्या विषयावर निबंध मागवून उत्तम निबंध लिहिणारास योग्य पारितोषिक द्यावें. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं व्याख्यानें देववून शेंडीपासून होणारे फायदे व ती काढून टाकण्यापासून झालेले तोटे लोकांच्या निदर्शनास आणून द्यावे. प्रत्येक शहरांत व खेड्यांत आपल्या सभेच्या शाखा व उपशाखा स्थापन करून व्याख्यानद्वारा व वर्तमानपत्रद्वारा ह्या विषया संबंधाने लोकमत जागृत करावें; एवढें सांगून मी खालीं बसतों.

**श्रीयुत प्रभाकर**—माझ्या सन्मान्य मित्रांचें मुद्देसूद भाषण ऐकून मला फार संतोष झाला; त्यांनीं केलेल्या सूचना मला सर्वस्वी मान्य आहेत. ह्या सूचनांस दुजोरा देण्यापूर्वी शेंडीपासून होणारे फायदे आपल्या नजरेस आणावेत, अशी माझी इच्छा आहे. पूर्वी आपल्यांत न्यायमूर्त रानडे व तेलंग असे विद्वान् होऊन गेले व सध्यां डॉ. भांडारकरांना आपण पाहात आहोंत. या सर्वांना मोठेपणा मिळण्यास शेंडीच कारणीभूत झालेली आहे, हें विसरतां कामा नये. हल्लीं शाळा व कॉलेजें ह्यांची संख्या इतकी वाढली असतांही रानडे, तेलंग व भांडारकर ह्यांच्या योग्यतेचा एकही पदवीधर निपजत नाहीं, ह्या कारणाचा कोणी विचार केला आहे काय ? याचें कारण हेंच कीं, पूर्वीचे विद्यार्थी शेंडया ठेवीत असत व त्यांपासून त्यांना अभ्यास करण्याला फार मदत होई. तुकाराम-बुवा म्हणतातः—

शेंडीस बांधोनियां दोरी । आपुल्या हातें टांगी वरी ॥ १ ॥
म्हणे मानेसी आंसडा बैसल्यावरी । मग ती निद्रा पळेल दुरी ॥ २ ॥

आतांच्या विद्यार्थ्यांस अशी कांहींच सोय नसल्यामुळ विद्यार्जनाचे कामीं त्यांना यावें तसें यश येत नाहीं आणि म्हणूनच पूर्वीसारखे

अहिल्या प्रतीचे विद्वान् आपल्यांत निपजत नाहींत. सर्व विद्यार्थी जर शेंडी ठेवूं लागतील, तर रानडे, तेलंग, मंडलीक, टिळक व भांडारकर ह्यांचा आपल्या ह्या आर्यभूमीवर पाऊस पडेल ! ह्या वातावरणांत विचाराचे तरंग खेळत असतात; ह्या तरंगांस आकर्षण करून घेऊन त्यांना मेंदूंत उतरविण्याची शक्ति आपल्या शेंडीच्या आंगीं असते. ह्यासाठींच पूर्वींचे ऋषि मोठमोठया जटा वाढवीत असत ! ज्यांच्या जटा फारच वाढलेल्या होत्या, अशा ऋषिवर्यांस प्रत्यक्ष वेदांचें दर्शन घडलेलें आहे ! पुढें जटांच्या ऐवजीं शेंडी येतांच त्या मानानें आर्यांचें बुद्धिसामर्थ्य कमी झालें ! आणि आज ती शेंडीसुद्धां नष्ट होत चालल्या-मुळें आपणांला ही अशी अवनत स्थिति प्राप्त झाली आहे. ही स्थिति जाऊन आपला देश पूर्वीप्रमाणें सुधारणेच्या उच्च शिखरावर विराजमान व्हावा, असें वाटत असेल, तर आतांपासून शेंडया ठेवण्याच्या सुरवातीला लागा; इतकें सां[illegible] माझा [illegible]संपवितों.

रानडे व तेलंग असे विद्वान् होऊन [illegible]वपूर्ण व [illegible]मद भाषणां[illegible] पाहात आहोंत. या सर्वांना मोठे[illegible]तां बराच वेळ झाल्यामुळ[illegible] झालेली आहे, हें विसरतां का[illegible]गरी करावयाची असल्यामुळें संख्या इतकी वाढली [illegible]नंति करितों. ( सर्वजण जातात ) योग्यतेचा एक[illegible]जन पुस्तक १७ वें. (थोडा फेरफार करून)

---

## स्वागतपर गाणें.

मंगल दिनिं या स्वागत आपुलें ॥
प्रेमें करितां मन किति धालें ॥ ध्रु० ॥
केले श्रम ते सुफलित झाले ॥
उत्सव करूं मानस हें सजलें ॥ १ ॥
उत्तेजन तुम्हि येउनि दिधलें ॥
बाळा आम्हां उपकृत केलें ॥ २ ॥

[illegible] ग्रंथालय ठाणे
३६ee